# मन उधाण वाऱ्याचे

**रवींद्र मालुंजकर**

कीर्ती प्रकाशन

© रवींद्र मालुंजकर
'श्रमसाफल्य', रीम बंगल्यासमोर,
गायखे कॉलनी, दत्त मंदीर रोड,
नाशिकरोड : ४२२१०१.
भ्रमणध्वनी : ९८५०८६६४८५. ९८८१५३६९६०.

**प्रथमावृत्ती**
१५ मे २००९

**प्रकाशक**
सूर्यकान्त दाणेकर
कीर्ती प्रकाशन,
१७, रचनाकार कॉलनी,
देवगिरी कॉलेजजवळ,
औरंगाबाद : ४३१ ००५.
फोन : ०२४०-६५४९०४५, २३५७२४५.

**अंतर्गत सजावट**
दीपक दंडवते

**मुद्रणस्थळ**
वेदान्त आर्ट प्रिंटर्स
सिडको, औरंगाबाद.

**मुखपृष्ठरचना**
अशोक सावंत

**किंमत**
रुपये ऐंशी

Man Udhan Varyache *(Articles)*
Ravindra Malunjkar/Rs. 80

*जीवनाच्या वाटचालीत*
*आधारवड झालेल्या*
*माझ्या ताई-दादांसह*
*सहप्रवासी बनलेल्या*
*सर्व सहृदयी आप्तेष्टांना*
*सविनय...*

## लेखक परिचय

| | |
|---|---|
| **नाव** | **रवींद्र मुकुंदराव मालुंजकर** |
| **व्यवसाय** | उपशिक्षक, माध्यमिक विद्यालय, श्री संत जनार्दन स्वामीनगर, पो. पळसे, ता.जि. नाशिक-४२२१०१. दूरध्वनी : ०२५३-२८०२१५३/भ्रमणध्वनी : ९८५०८६६४८५. |
| **छंद** | काव्यलेखन आणि प्रासंगिक स्फुटलेखन. |
| **विशेष ओळख** | नाशिक जिल्ह्यातील शहरांपासून ग्रामीण भागातील कविसंमेलनांचे खुसामदारपणे सूत्रसंचालन करणारा सूत्रसंचालक म्हणून ओळख. |
| **साहित्यकृती :** | ‘आयुष्याचे गाणे’ हा काव्यसंग्रह महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांचे नवलेखक अनुदान योजनेतून प्रकाशित (२००४) ‘मन उधाण वाऱ्याचे’ हे पुस्तक औरंगाबादच्या कीर्ती प्रकाशन संस्थेमार्फत प्रकाशित. (२००९) |
| **पुरस्कार** | **जिल्हा युवा पुरस्कार-** नेहरू युवा केंद्र, नाशिक या कार्यक्रम व खेल मंत्रालय,भारत सरकार (२००४)<br>**गुणवंत शिक्षक पुरस्कार-** नाशिक जिल्हा माध्यमिक शिक्षक पतसंस्थेचा साहित्यनिर्मितीविषयीचा पुरस्कार (१९९९)<br>**श्रमभूषण व श्रमगौरव पुरस्कार-** श्रमिक सेवा मंडळ, एकलहरे, नाशिक यांचा श्रमभूषण व श्रमगौरव पुरस्कार.<br>**स्वा. सावरकर गौरव पुरस्कार -** भगूर येथील शिवविजय ग्रुपचा स्वा. सावरकर गौरव पुरस्कार (२००८)<br>**नाशिकरोड भूषण पुरस्कार -** शांतीलाल संघवी (सर) प्रतिष्ठानचा मानाचा सांस्कृतिक क्षेत्रासाठी दिला जाणारा नाशिकरोड भूषण पुरस्कार (२००८)<br>**वक्तृत्व, निबंध, काव्यलेखनाचे विविध जिल्हा व राज्यस्तरीय पुरस्कार.** |
| **निवड** | नाशिकला जानेवारी २००५ मध्ये झालेल्या ७८ व्या अ.भा. मराठी साहित्य संमेलनात ‘शब्दरंग’ या नवोदितांच्या कविसंमेलनात काव्यवाचनासाठी निवड. |

# मनातलं...

'आयुष्याचे गाणे' या माझ्या पहिल्या काव्यसंग्रहानंतर 'मन उधाण वाऱ्याचे' आपल्या हाती देताना मनस्वी आनंद होतोय. ललितगद्य लेखांचा संग्रह माझ्या मनातील भावभावनांचे हिंदोळे आपल्या मनातील कडू-गोड आठवणींना उजाळा देतील. आपल्या मनाला आनंद देऊन, दु:खावर किंचितशी फुंकर घालून 'ये हृदयीचे ते हृदयी' अशा मानवतेचे नाते अधिकच घट्ट करण्याचा हा अल्पसा प्रयत्न. आयुष्यात आलेल्या अनेक सहृदयी नात्यांचा गोडवा जपत जपत आयुष्याची वाटचाल सुखी आणि समृद्धीचा चिरंतन ठेवा बनली आहे.

तसा मी कविता लिहिणारा. भावकवितांबरोबरच प्रासंगिक लेखन करीत असताना असे काही प्रसंग मला अचानक ललितगद्य लेखनाची ऊर्मी देऊन गेले. वनाधिपती मा. विनायकदादा पाटील यांनी एक कार्यक्रम संपल्यानंतर 'बाळ, तुझ्याकडे अंगण आहे का?' असा प्रश्न विचारून माझ्या हाती गुलाबाच्या रोपट्याची कुंडी दिली नि 'या नभाने या भुईला दान द्यावे' या हिरव्यागार लेखाचा जन्म झाला. माझ्या आईच्या वात्सल्याबरोबरच तिच्यात असलेल्या खंबीरपणाच्या संस्काराचा प्रभाव माझ्यावर जास्त पडला आणि 'माझी कणखर आई' मी व्यक्त करू शकलो. तसाच प्रसंग माझ्या पत्नीबाबत घडला. आमच्याकडे येणारे रानडेबाबा माझी पत्नी सौ. जयाने काढलेल्या सुबक रांगोळीचे सदैव भरभरून कौतुक करायचे. ही गोष्ट मला सांगून त्यांनी 'अहो लेखक महाशय, जयाच्या रांगोळीबद्दल एखादा लेख लिहा हं!' असे उद्युक्त केल्यानेही लेखन झाले.

अगदी लहानपणापासून मला पाऊस खूप आवडतो. सुख-दु:खाचे सारे क्षण जिवंतपणे थेंबाथेंबातून अनुभवताना माझ्यातल्या लेखकाला सातत्याने खुणावतो, लिहायला भाग पाडतो आणि मग आठवणींच्या काव्याला मी ललितगद्याची वाट मोकळी करून दिली. पुस्तकातील लेख यापूर्वी दैनिक देशदूत, व्यासपीठ दीपावली अंक आणि मासिक कादवा शिवार यांत प्रकाशित झालेले आहेत. कीर्ती प्रकाशन या प्रसिद्ध प्रकाशन संस्थेचे श्री. सूर्यकान्त दाणेकर आणि अंतर्गत सजावट करणारे श्री. दीपक दंडवते, चित्रकार श्री. अशोक सावंत यांचेही मन:पूर्वक आभार मानतो. अनेक ज्येष्ठ आणि श्रेष्ठ साहित्यिक आणि कलावंतांनी, तसेच लेखांमध्ये शब्दांची श्रीमंती पेरणारे अनेक शब्दप्रभू यांनी माझी नेहमीच पाठराखण केली आहे. परिवाराची साथ असल्यामुळेच मी मोकळेपणाने लिहू शकलो. आपल्यासारख्या रसिकांची भरभरून दाद मला मिळावी, हीच अपेक्षा!

***– रवींद्र मालुंजकर***

# अनुक्रमणिका


माझी 'कणखर' आई/७
...तिची रांगोळी/१०
पाऊस, मी अन् ती/१२
ह्या नभाने या भुईला दान द्यावे.../१५
...संसार हा सुखाचा/१७
आला पाऊस पाऊस..../१९
सांगा कसं जगायचं?/२२
बिन तेरे जिया जाये ना...२५
मन उधाण वाऱ्याचे.../२७
प्रवास/२९
जीवनगाणे... गातच रहावे!/३१
सय पुन्हा येणे नाही.../३३
ऋतू हिरवा... ऋतू बरवा!/३५
दिसामाजी थोडे वाचीत जावे!/३७
स्पर्श/३९
पाऊस तुझ्या सयीचा.../४१
घर दोघांचे... घरकुल पाखरांचे/४३
आत्मविश्वासाची गुरुकिल्ली/४५
दीपावली : आनंदाचा झरोका/४७
चिंब सलाम.../४९
तू भेटतेस तेव्हा.../५१
शुभेच्छा!/५३
प्रेम : संस्कृतीचा सारांश/५५
मना घडवी संस्कार.../५७
भिजल्या मातीत.../५९
शब्दफुलांचा महोत्सव.../६२
माझी सखी, माझं सर्वस्व!/६६
पाहिजेत शब्द ..../६८
कवितेच्या थेंबातून.../७०
जीवनात ही घडी.../७५
स्वप्नांची मोहमयी दुनिया/७७
पाऊस असा वेडा की.../७९

एक

# माझी ‘कणखर’ आई

*‘दारिद्र्याच्या संसाराचे नंदनवनही करते आई..*
*चिलापिलांना प्रकाश देण्या दिव्यासारखी जळते आई...’*

गझलकार गौरवकुमार आठवले यांच्या या उत्कट ओळी माझ्या प्राणप्रिय आईच्या कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वाला खऱ्या अर्थाने अधोरेखित करणाऱ्या आहेत. स्वाभिमान, संस्कार, खंबीरपणा, नीतीमत्ता असे अनेक गुण तिच्या ठायी भरलेले होते. तशी माझी आई खूपच खंबीर. वरवर काटेरी असणाऱ्या फणसासारखी दिसणारी. प्रथमदर्शनी स्पष्टवक्ती नि रागीट. परंतु फणसाच्या आत असणाऱ्या गोड- रसाळ गराने जसा आस्वादक तृप्त होतो, त्याचप्रमाणे संपर्कात येणाऱ्याला आचार-विचारांचा मधाळ गोडवा देणारी कोमल हृदयाची माझी आई.

अतिशय गरिबीचा संसार सांभाळताना ‘कणखर’पणाचं मूर्तिमंत प्रतीक असणारी माझी आई नावाप्रमाणेच ‘सुमन’ होती. स्वत: काटेरी कष्टप्रद आयुष्य जगून आमच्या कुटुंबाला फुलाप्रमाणे जपत जपत स्वत: मात्र झिजत गेली. संस्कार म्हणजे काय? हे तिच्या कर्तृत्वातून शिकत-अनुभवत मी लहानचा मोठा झालो. आयुष्यातील सारी सुखं मला आणि माझ्या कुटुंबाला देताना माहेरची परिस्थिती उत्तम असूनही त्यांच्या एकाही पैशाचा आधार न घेता, लग्न झाल्या-झाल्या रुपया रोजाने शेतात राबणारी, डॉक्टरकडे आया म्हणून काम करणारी,जुन्या डंगरी शाळेत केवळ दुसरी शिकलेली असूनही जिद्दीने शिवणक्लास पूर्ण करणारी, माझ्यातल्या कवीला फुलविणारी, माझ्या वडिलांच्या तापट परंतु माणुसकीच्या नात्याला जीवापाड जपणारी, घरी येणाऱ्या प्रत्येक पाहुण्याचे योग्य आदरातिथ्य करणारी, वडिलांच्या दीर्घ आजारपणात खचून न जाता खंबीरपणे सेवा करणारी, वडिलांचा मृत्यू डोळ्यासमोर दिसत असताना कणखरपणे आला दिवस मागे टाकणारी, वडिलांच्या निधनानंतर पै-पै साचवून आमचा आईबरोबरच वडील म्हणूनही सांभाळ करणारी, स्वत:चं दीर्घ आजारपण आणि स्वत:च्या मृत्यूनंतरच्याही सर्व खर्चाची तरतूद स्वत:च करणारी अशी कितीतरी आवश्यक आणि अशक्यप्राय कामं तिने अतिशय सहजपणे केली. या सर्व प्रसंगांतली तिची कितीतरी रूपे डोळ्यासमोर उभी राहताना मन व्याकूळ होतं. भावी जीवनाच्या वाटचालीचा आदर्श आणि संस्कारांचा महान ठेवा ठेवून गेलेली माझी एकमेवाद्वितीय आई.



तिचे आणि वडिलांचे संस्कार घेऊनच उच्च विद्याविभूषित होऊन शिक्षक म्हणून अध्यापनाच्या क्षेत्रात संस्कारांची शिदोरी वाटण्याचं काम मी करीत आहे. मातापित्यांच्या संस्कारांमुळेच हे सारे घडले आहे, याचा मला अभिमान वाटतो.

तिच्याप्रमाणेच आम्हा कुटुंबियांच्या आयुष्यात अनेक चढ-उतार आले. नात्यांच्या बंधनांचे, दु:खाचे अनेक कटूप्रसंग ओढवले, पण त्यातून खंबीरपणे बाहेर पडण्याचे आणि जगण्याच्या अस्तित्वाच्या लढाईत यशस्वीपणे ठाम उभे राहण्याचे तिने दिलेले अमूल्य संस्कार यामुळेच आम्ही जिद्दीने ध्येयवादी वाटचाल करीत आहोत.

माझ्यातल्या रवीचा ‘कवी रवी’ घडविण्यात, आल्यागेल्या पै-पाहुण्यांचा योग्य तो पाहुणचार करण्याची सवय लावणारी माझी आई रात्री-बेरात्री घरी आलेल्या पाहुण्याला उन-उन पिठलं-भाकरी करून देऊन तृप्त करायची. त्याचा समाधानाचा ढेकर तिला नव्या उमेदीनं काम करण्याचं बळ द्यायचा. हे करताना तिने कधीही तोंड वेडेवाकडे केले नाही. माझ्या परिवाराला आजतागायत ती सवय लागली आहे, ती केवळ तिच्यामुळेच!

माता-पित्यांच्या संस्कारांचे, नैतिकतेचे धडे गिरवत गिरवत मी लहानचा मोठा झालो. गरिबीचे चटके त्यांनी स्वत: सोसले. मला आणि माझ्या परिवाराला प्रत्येक गोष्ट मिळेच. मात्र ती पैसे आल्यावर. माझे वडील शाळेत शिपाई होते. त्यांच्या खाकी गणवेशाच्या जुन्या पॅन्टची मला शाळेची पॅन्ट शिवली जाई. कपडा जुना असल्याने माझी तिने शिवलेली पॅन्ट लवकर फाटायची. आई मागील बाजूला ठिगळ लावायची. मात्र खाकी रंगाचा दोरा नसल्याने पांढऱ्या दोऱ्याने रफू केल्याचे शर्ट इन केल्यावर दिसे. शाळेतली मुलं चिडवत, ‘तुला पाठीमागून दोन डोळे आले...’ मी रडत-रडत घरी जाई. रडण्याचे कारण विचारताच मी आईला मुलं मला चिडवत असल्याचे सांगितले. ती म्हणाली, ‘अरे कुणाची गरिबी आयुष्यभर राहत नाही. आपण कष्टातून नक्कीच पैसे मिळवू. मग नवीन ड्रेस घेऊ. मुलांनी चिडवल्यावर रडू नको.’ तिच्या सांगण्यावरून नंतर हा प्रसंग केव्हाच आला नाही. तिच्या आणि दादांच्या अहोरात्र मेहनतीला फळ मिळालं. माझ्या बहीण-भावाचे नि माझे दोनाचे चार हात झाले. संसार बहरला. चिमणी पाखरं चिव-चिव करू लागली. साहित्यसेवेतील पुरस्कारांची अनेक सन्मानचिन्हे घरात गर्दी करू लागली. मात्र यामागे राबणारे आणि खऱ्या अर्थाने यशाचे शिल्पकार असणारे माझे प्राणप्रिय मातापिता हे सुख उपभोगायला राहिले नाहीत, ही खंत मनात आहे. मनाची श्रीमंती आमच्यासाठी सुख-समृद्धीची फळं देऊन ते निघून गेले. राबराब राबून पै-पै जमा करून त्यांनी आम्हाला पत्र्याच्या घरातून प्रशस्त-हवेशीर तीन खोल्यांचा फ्लॅट घेऊन दिला. आयुष्यभराची पुंजी जमा करून स्वत:च्या कर्जबाजारीपणाचा भार आमच्यावर पडू दिला नाही. स्वत:च्या मृत्यूनंतरच्या विधीच्या

खर्चाची तरतूदही तिने स्वत:च करण्याच्या वृत्तीमुळे माझं-मुलाचं कर्तव्य पार पाडण्याची संधीही तिने मला दिली नाही. इतका स्वावलंबीपणा, गरजेसाठी दुसऱ्यापुढे हात न पसरण्याची त्यांची वृत्ती, आलेल्या पांथस्थाला चटणी-भाकरी खाऊ घालण्याचं दातृत्व आणि माझ्यासह अनेकांना दीपस्तंभासमान प्रकाशमान दिशा दाखविणारी, माझ्या बहीण आणि पत्नीला सुसंस्कारांची शिदोरी देऊन माझ्यात माणुसकी रुजवणारी माझी कणखर आई आणि माझे वडील यांच्याबद्दल जुन्या लोकगीतातील ओळींतून त्यांना कृतज्ञता व्यक्त करतो...

'बाप्पाजी माझा वड, माय माझी फुलजाई
दोघांच्या पुण्याईची, काय सांगू बडेजाई!'

✽✽



दोन

# ...तिची रांगोळी

दररोज न चुकता ती सकाळी सकाळी दारासमोर आणि तुळशीवृंदावनाजवळ सुबकशी रांगोळी काढते. रोज वेगवेगळ्या रंगसंगतीची गुंफण असणारी तिची रांगोळी जणुकाही तिचं मनच माझ्यासमोर मोकळं करते. इतकंच नाही तर माझ्या मनाला ती छानशी रांगोळी उत्साह, चैतन्य देते. रोजचा नवा आणि प्रसन्न दिवस त्या रांगोळीमुळे नावीन्याची नजाकत पेश करीत राहतो.

बऱ्याच वर्षांपासून तिची रांगोळी मी मनात साठवतो आहे. मात्र रोज नवनवीन रांगोळी ती कशी काढते, याचे कोडे आजही मला उलगडलेले नाही. 'ये हृदयीचे ते हृदयी' या न्यायाने काही अपवाद वगळता रोजच तिच्या मनाप्रमाणे जसा हात वळेल तशी ती रांगोळी काढत राहते. माझ्याशिवाय आमच्या घरी येणारे वा शेजारीपाजारी तिच्या रांगोळीची तोंडभरून स्तुती करतात. मी मात्र तिच्या रांगोळीला 'घर की मुर्गी दाल बराबर' यानुसार फक्त पाहतो.

मात्र परवा परवा मी तिच्या रांगोळीकडे-पर्यायाने तिच्या मनातल्या प्रसन्नतेकडे जाणीवपूर्वक पाहू लागलो. रांगोळीतला पांढरा रंग माझ्या मनाला प्रकाशमान करून नवचैतन्य देतो. हिरवा रंग मनाची हिरवाई अधिक गडद करून टवटवीतपणा देतो. पिवळा रंग सोनेरी झळाळी देऊन मनाची श्रीमंती वाढवतो. तर लाल, जांभळा, निळा, काळा असे विविध रंग सुखी आणि दु:खी विविध प्रसंगांना खंबीरपणे सामोरे जाण्याच्या तिच्या वृत्तीला अधोरेखित करतात.

रांगोळीच्या रोजच्या सरावाने ती आता अधिकाधिक सुबक आणि आखीव रेखीव रांगोळी काढते आहे. नव्याचे नऊ दिवस जाऊन संसारामध्ये जशी परिपक्वता येते, तशी तिची रांगोळीही आता परिपक्व बनली आहे. नवनवीन जाणीवा, नव्या आशा-आकांक्षा तिच्या रांगोळीतून डोकावू लागल्या आहेत. तिची रांगोळी अखंडपणे मनाला तजेला देत राहते.

जीवन जगत असताना रोज रोज सुखाच्या क्षणांबरोबरच दु:खाचे काटेरी क्षणही येतच राहतात. अशा क्षणात तर तिच्या आकर्षक रांगोळीची प्रकर्षाने आठवण येते. आयुष्याच्या सुखद गोड क्षणांना वाटून घेताना तिची रांगोळी माझी प्रिय सखी होते, तर दु:खद क्षणात

तिची रांगोळी मला भक्कमपणे सांभाळणारी आधारवड होते. रांगोळीच्या प्रत्येक ठिपक्यातून तिचं अस्तित्व माझ्या मनावर अधिराज्य गाजवत राहतं.

तसं पाहिलं तर दुकानात दिसणारे रांगोळीचे ढीग आणि दारासमोर किंवा सण-समारंभासाठी काढल्या जाणाऱ्या रांगोळ्या यात दिसणारा जमीन-अस्मानाचा वेगळेपणा प्रत्येक आस्वादकाला आकर्षून घेतो. असाच अविस्मरणीय आणि आनंददायी अनुभव तिच्या रोजच्या रांगोळीतून प्रामुख्याने दिसून येतो. आजची रांगोळी कालपेक्षा अधिक चांगली दिसून उद्याच्या नव्या रांगोळीची ओढ निर्माण करते.

मला तर तिच्या रांगोळीतल्या कित्येक गोष्टींचा अजूनही उलगडा होणे बाकी आहे. कारण तिचं मन आणि तिचा रांगोळी काढताना वळणारा हात का आणि कसा वळतो? याचं उत्तर अजूनही न मिळाल्याने, तिची रांगोळी आणि त्या रांगोळीतील आकर्षकता मी आजही मनाच्या कुपीत जपून ठेवली आहे.

रोजची सकाळ अधिक नवी, रोजचा टवटवीतपणा अधिक टवटवीत, रोजच्या आशा-आकांक्षा चैतन्यशील बनवणारी तिची रांगोळी आयुष्यभर संसाराचा, प्रेमाचा, जिव्हाळ्याचा, चिमण्या पाखरांच्या निरागसतेचा परमोच्च बिंदू आणि परमानंद देत असते. आनंदाच्या, सौख्याच्या साऱ्या व्याख्याच तिच्या एका रांगोळीपुढे फिक्या पडत जातात.

कधी कधी ती आपल्या मनातील आनंद व्यक्त करीत नाही, तेव्हा तिची रांगोळी हसून म्हणते, 'कसं फसवलं?' तिच्या या फसवण्याने माझ्या आनंदाला सीमा राहत नाही. तिची मूर्ती त्या रांगोळीतून दिलखुलास हसताना दिसते.

आजही धुळीत मिळालेली रांगोळी पाहिली की, तिचा दिवसभराच्या कामाचा थकवा दिसून येतो. दुसऱ्या दिवशी सकाळी-सकाळी झाडलोट केलेल्या अंगणातील मनोहारी रांगोळी माझ्या नव्या दिवसाची प्रसन्न सुरुवात करते. नक्कीच 'शुभास्ते पंथान:' म्हणत राहते. अशी आहे तिचं नि माझं मन जुळविणारी रांगोळी...!

✽✽



तीन

# पाऊस, मी अन् ती

पाऊस...तिची अन् माझी भेट घडवून आणणारा महत्त्वाचा दुवा. तिला 'भेटायला ये' असा निरोप दिला अन् तिच्या येण्याची वाट पहात राहिलो. पण तिच्याअगोदर तो हजर. थेंब... लहान सरी... धुवाँधार बरसात! काय वर्णन करू त्या जोरदार पावसाचं? थांबायचं नावच घेत नाही. ती मला भेटायला निघाली असेल; रस्त्याने पावसात भिजले तर सर्दी होईल किंवा आम्ही दोघं भेटल्यावर चिंबचिंब भिजण्याची मजा घेऊ... यांसारख्या विचारांनी ती आडोशाला उभी राहिली असेल... माझ्या डोळ्यासमोर अशी एक ना अनेक चित्रं उभी ठाकलेली. अशावेळी आमच्यातला मध्यस्थी असणारा पाऊस मला नकोसा वाटला. त्याला रागवण्यासाठी तोंड उघडणार, तोच तिचा ओलेता पाय माझ्या ओसरीच्या दारात, आणि मी न भिजताच चिंबचिंब!

काय करावं या पावसाला? तिच्या आगमनाची तुतारी तर फुंकली, पण आम्हाला घरापासून दूर गेल्यावर यायचं ना. घरातच अडकवलं त्यानं! आता बाईकवर कसं बसायचं! तिच्या निथळत्या धारांना कसं चुंबायचं? हे मनातले मांडे मनातच खात बसलो आणि चक्क पाऊस थांबला. त्याचवेळी त्याचं नि माझं एकच नातं असल्याचा भास झाला. जमीन आणि पाण्याच्या एकरूपतेसारखा! कारण प्रिया जमीन आपल्या प्रियकर पावसाच्या मीलनासाठी, नखशिखांत भिजण्यासाठी, सृजनासाठी आसुसलेली असते. मी याहून वेगळा तर नाही ना? मी पाऊस, ती जमीन. आमच्या दोघांची भेट आणि तो पावसाने ओलाचिंब झालेला दिवस.

काल तिच्या डोळ्यात मी पाऊस बघितला. का कोण जाणे, तिच्या डोळ्यातल्या पावसात माझ्या आठवणींचे पक्षी विहरताना दिसले. आणि मी चक्क तिच्या डोळ्यातला पाऊस चोरून माझ्या हृदयाच्या कप्प्यात ठेवला. तेव्हा कुठे तिच्या लक्षात आलं की तो पाऊस केवळ तिचा नसून आमचा आहे. शेवटी पाऊसच तो. आम्हाला जोडणारा दुवा. तिच्यावरही मनसोक्त पाण्याची उधळण करणारा आणि माझ्याकडून सातत्याने प्रेमाची उधळण करून घेणारा. म्हणूनच मी तिला आता कधी रडवत नाही आणि तीही रडण्याचं सोंग कधी करीत नाही. पावसाने अशी आमची गट्टी जमवली आणि मुसळधार पावसाला सुरुवात झाली.

'मला पाऊस खूप आवडतो. तुला आवडतो का? असं विचारल्यावर का कोण जाणे,

तिनं नकारार्थी मान हलवली. माझ्या डोळ्यात राग, ती मात्र बिनधास्त. मी विचारात पडलो, तिने विचारांवर मात केली आणि पुढचे सगळे प्रश्नच मिटवून टाकले. माझ्या डोळ्यात पाऊस दाटला. मी खंबीर! तिला मात्र दाखवला नाही. उगीचच ती 'मला पाऊस आवडतो... खूप खूप आवडतो... अगदी तुझ्यासारखा...!' असं मुद्दामहून म्हणेल म्हणून... पण खरं सांगू का? तिला माझा स्वभाव माहीत आहे. पावसासारखा. मी प्रथम थेंब थेंब... नंतर सरीवर सरी येऊन मुसळधार. तिला पाऊस आवडावा म्हणून मी त्या पावसाची चातकासारखी वाट पाहतोय. कुणी सांगा तरी त्याला की, मी तहानलेला आहे, तिच्या प्रेमाला, तिच्या सोबतीला आणि पाऊससरीत चिंब चिंब भिजायला...

मुसळधार पाऊस... आम्ही फिरत फिरत चिंब चिंब भिजलो. रस्त्यावर वाहणाऱ्या पाण्यातून चाललेलो. गाडी अचानक बंद होते, तिच्या डोक्यात कल्पना... 'या पाण्यात होडी सोडायची का?' मी लगेच खिशातला ओला कागद काढतो. ती होडी तयार करते. पाण्यावर सोडते. आपण या होडीत बसलो तर? तिचा प्रश्न; मी निरुत्तर. होडी कागदी असूनही मन होडीभोवती फिरत राहिलं. मुसळधार पावसात होडी मोडून गेली. मला हायसं वाटलं, होडीत बसलो नाही म्हणून. ती मात्र रडवेली, होडी मोडली म्हणून; तिच्यात बसण्याचा आनंद गेला म्हणून. तिच्या चेहऱ्यावर अश्रू झरू लागले आणि तिकडे पाऊस बंद झाला. काय योगायोग? ती रडणं विसरून पुन्हा होडी तयार करू लागली आणि मी बाईकला किक मारली. होडी करायची सोडून ती माझ्यामागे बसली आणि पुन्हा पाऊस सुरू झाला. थेंबाथेंबांनी मुसळधार पडेपर्यंत पाऊस वाढतच गेला आणि आम्ही चिंब चिंब भिजलो.

पाऊस बाहेर धिंगाणा घालत होता नि आत माझ्या मनात काहूर उठत होते. का कोण जाणे? पण आठवणींचे पक्षी सैरावैरा धावायला लागले होते. सखीच्या मनाचा पैलतीर गाठून माझ्या मन:पटलावर येऊन सातत्याने आदळत होते. मला आजही आठवतो, तिच्या पहिल्या भेटीचा तो दिवस. की जो मी हृदयाच्या कप्प्यात जपून ठेवला आहे.

*हा पाऊस आला आला*
*जखमेला करूनि ओला,*
*तिच्या पहिल्या त्या भेटीचा*
*हा आठव जागा झाला.'*

या डॉ. विठ्ठल शिंदे यांच्या कवितेतील ओळींमधला शब्दन् शब्द मला खरा होताना दिसू लागला. तो पावसाचा दिवस जणू माझ्यासाठी आनंदाचा दिवस बनून आला होता. तिच्या पहिल्याच पावसाळी नजरेनं माझ्या शुष्क जमीनरूपी चेहऱ्यावर तृप्तीचं हास्य फुलवलं



होतं. तिचं ते निथळत्या धारांचं हास्य माझ्या मनमयुराच्या पिसाऱ्याला थुईथुई नाचवत होतं. अशी काय नि कोणती मोहिनी घातली तिनं कोण जाणे! समजत तर काहीच नव्हतं, पण खूप समजल्यासारखं वाटत होतं. एखादी प्रिय व्यक्ती खूप दिवसांनी भेटली की, काय बोलावं नि काय करावं, याचं भान जसं राहात नाही ना; अगदी तसंच मला त्यावेळी झालं. तिच्या स्वागतासाठी मी हात पुढे केला आणि बाहेर पाऊस थांबला.

पावसाला अनेकांनी शब्दांच्या कवेत पकडण्याचा प्रयत्न केला आहे नि त्याचा बहर उजळवण्याचा प्रयत्न केला. मात्र तो असाच आहे. कधी कधी मुठीत पकडता येतो, तर कधी नखशिखांत भिजूनही आतून माणूस मात्र कोरडाच राहतो.

✤✤

चार

## ह्या नभाने या भुईला दान द्यावे..

**'ह्या नभाने या भुईला दान द्यावे,**
**आणि ह्या मातीतुनि चैतन्य गावे...'**

अशी अस्सल मातीची कविता लिहिणाऱ्या कविवर्य ना. धों. महानोर यांची 'आनंदयात्रा' मनात साठवून नाशिकच्या महाकवी कालिदास नाट्यगृहातून बाहेर पडत होतो. तेवढ्यात रसिकसमीक्षक, हसतमुख असे वनाधिपती विनायकदादा पाटील समोर आले. माझ्या नेहमीच्या सवयीप्रमाणे नम्रपणे आदरपूर्वक नमस्कार करताच, 'बाळ! तुझ्याकडे अंगण आहे का?' असा प्रश्न करून, त्यांना सत्कारात मिळालेल्या गुलाबाच्या कलम केलेल्या रोपट्याची कुंडी त्यांनी विश्वासानं माझ्या हाती सोपवली. आई-वडिलांनी आपल्या मुलीचा हात नवऱ्या मुलाच्या हातात कायमचा द्यावा किंवा चार वर्षे जिवाचा नि हाताचा पाळणा करून सांभाळलेलं मूल आईनं शिक्षकांच्या ताब्यात पुढच्या उज्ज्वल भवितव्यासाठी द्यावं! त्यावेळी जाणवणारी हुरहुर किंवा भावी आनंद हा नावीन्याचा, अधाशीपणाचा असतो. तसा आत्मिक आनंद दादांनी दिलेल्या त्या 'सजीव' कुंडीमुळे झाला.

स्वत:चा टू रूम किचनचा फ्लॅट सोडून, मी नाशिकरोडला भाडेतत्त्वावरील परंतु मागे परसबाग आणि पुढे मोठं अंगण असलेल्या घरात रहायला आलो. अंगणात डोलणारी तुळस रोज माझं मन प्रसन्न आणि टवटवीत करते. शिवाय सौभाग्यवतीच्या रोजच्या सांगण्यामुळे मी तुळशीला नव्हे, त्या प्रसन्नतेला वंदन करून कामाला निघतो. दादांच्या या दातृत्वाच्या छोट्याशा प्रसंगाने मी खरा सजीव झालो. अनुभव लिहिता झालो. टू रूम किचनच्या मुख्य दरवाजासमोरचा पॅसेजही कॉमन असतो, तेव्हा अंगण तर दूरच. परंतु दादांनी विश्वासानं ते गुलाबाचं टवटवीत रोपटं माझ्या हाती ठेऊन, मनापासून जोपासना करण्याची अदृश्य जाणीवही करून दिली. सृजनता, नवनिर्मितीच्या लेखनाची जातकुळी असणारे अनेक साहित्यिक जसं आपल्या लेखनाद्वारे मनाला चैतन्य, उभारी देऊन जातात, तसंच जणू त्यावेळी मला झालं.

'झाडे लावा, झाडे जगवा'च्या तोंडाळ गप्पा मारण्यापेक्षा प्रत्यक्ष काम करण्याची जबाबदारीची प्रेरणा या रोपट्याने मला दिली. जणुकाही 'ये हृदयीचे ते हृदयी' अशी उक्ती सार्थ ठरवणारे दादांचे हृदयच जणू मला मिळालेल्या रोपट्याच्या माध्यमातून मिळाले.



म्हणूनच टवटवीतपणा, चैतन्य, सदाबहारता, प्रसन्नता यांचा नमुना ठायी ठायी असणारा गुलाब फुलण्याची मी मनापासून वाट पहातोय, त्याला रोज पाणी घालतोय, त्याचा सांभाळ करतोय, माझ्या दोन चिमण्या पाखरांबरोबरचं तिसरं मूल म्हणून. पहिला उमललेला गुलाब मी दादांना देणार आहे. कुठल्याशा कठीण प्रसंगी नुकतंच जन्मलेलं आपलं मूल दुसऱ्याला सांभाळायला द्यावं, त्यानंतर काही वर्षांनी आपल्या मुलाची भेट व्हावी आणि तेव्हा होणारा आनंद जसा शब्दातीत असतो, तसा अनपेक्षित आनंद कदाचित त्यांना होईल. त्यामुळे त्यांनी ज्या विश्वासानं माझ्या हाती ते इवलंसं रोपटं दिलं, त्या विश्वासाला मी तडा जाऊ देणार नाही. माझ्या चैतन्याला बहर येईल. माझ्या आनंदापेक्षा कित्येक पटीनं दादा समाधानी होतील. त्यांच्या चेहऱ्यावरील समाधानाचं हसू पाहून तो गुलाब आणखीनच टवटवीत होईल, प्रसन्नपणे आम्हाला जगण्याची, सुखाची, चैतन्याची उभारी देईल. या प्रसंगाने...

*'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे,*
*पक्षीही सुस्वरे आळविती ॥'*

ही संतश्रेष्ठ तुकोबांची जाणीव आणि माझ्यातला खरा पर्यावरणप्रेमी माणूस दादांनी यामुळे जागा करून दिला. त्या रोपट्याच्या साक्षीनं माझ्या आयुष्याला नवा आकार मिळतो आहे, नव्या जाणिवा निर्माण होताहेत. रूटीन आयुष्यात थोडंसं का होईना, सृजनशील जगणं त्या रोपट्याकडे पाहून मी अनुभवतो आहे. काट्यांच्या खडतर सहवासातही भविष्यातील त्या रोपट्याचं पानाफुलांनी बहरणं आणि चैतन्यदायी वाढणं, मी मनात साठवतोय.

✾✾

पाच

# ...संसार हा सुखाचा

'संसार हा सुखाचा, मी अमृतात न्हाले...' हे गोड गाणे ऐकताना प्रत्येक माणसाचे सुखी संसाराचे स्वप्न डोळ्यासमोर तरळून गेले. 'संसार' या तीन अक्षरी शब्दात 'स' म्हणजे संगत, 'सा' म्हणजे सामर्थ्य आणि 'र' म्हणजे रक्षण या तीन गोष्टींचा एकत्रित आविष्कार दिसून येतो. परस्परांच्या संगतीतून सामर्थ्यानिशी सर्वांचे रक्षण करण्याची जबाबदारी आपोआप प्रत्येक संसारी माणसावर येत असते.

'हे विश्वचि माझे घर, ऐसी मति जयाची स्थिर, किंबहुना चराचर, सुखी झाला!' असं ज्ञानेश्वर माऊलींनी म्हटल्याप्रमाणे साऱ्या विश्वाला संसार मानणारे फारच तुरळक असतात. जन्माला येणाऱ्या प्रत्येक माणसाला आपले सुखी संसाराचे स्वप्न पूर्ण होण्याची मनीषा असते. दु:खावर मात करून सुखाची गुरुकिल्ली सापडण्याची किमया साधणारी, सुखी संसाराचा रथ ओढणारी जोडपी आदर्श संसाराचा उत्तम वस्तुपाठ घालून देतात. मनाप्रमाणे मिळालेली जोडीच फक्त यशस्वी संसार करू शकते असे नाही, तर मनाप्रमाणे घडलेले नसतानाही आहे त्या परिस्थितीत संसाराचा भार आनंदाने सहन करणाऱ्यांची संख्याही कमी नाही. खान्देशकन्या बहिणाबाई चौधरींनी म्हटल्याप्रमाणे -

*अरे संसार संसार*
*जसा तवा चुल्ह्यावर,*
*आधी हाताले चटके*
*तव्हा मियते भाकर...*

तशी जीवनरूपी भाकर भाजताना प्रथमत: अनेक दु:खी चटक्यांना सोसत सोसत तारुण्यात सुरू झालेली संसारवेल फळाफुलांनी बहरण्याची किमया घडवावी लागते. विवाहबंधनात अडकण्यापूर्वी प्रत्येकाने आपल्या भावी संसाराबद्दल अनेक अपेक्षा, आकांक्षा मनात योजलेल्या असतात.

त्यांची पूर्तता संपूर्णत: होणे कधीही शक्य नाही. मात्र संसारात पडल्यानंतर येणारी दु:खं, समस्या यातून सुटण्यासाठी एकमेकांचा आधार आवश्यक असतो. असा आश्वासक आधारच सुखी संसाराला अधिक खुलवतो आणि मग 'मी माझा'कार चंद्रशेखर गोखलेंनी म्हटल्याप्रमाणे-



*घर दोघांचं असतं*
*ते दोघांनी सावरायचं,*
*एकाने पसरवलं*
*तर दुसऱ्याने आवरायचं*

असा अनुभव येतो. खरंतर संसार म्हणजे रोज रोज येणाऱ्या कडूगोड अनुभवांचं संचित. जन्मापासून मरेपर्यंत, आबालवृद्धांच्या अनेक नात्यांचा हिंदोळा संसाराची गोडी वाढवतो. अत्यंत रसिकतेने संसाराची गोडी चाखताना माणुसकीचा ओलावाही अत्यंत आवश्यकच असतो. अनुभवांची प्रामाणिकता घेण्याची वृत्ती जर तरुणपणात जाणीवपूर्वक जोपासली तर संसार कधीही कंटाळवाणा वाटत नाही.

आयुष्य रसिकतेने जगण्यासाठी आणि विश्वातला सर्वात सुखी संसारी माणूस होण्यासाठी प्रत्येक माणसाने आपल्या इच्छा, आकांक्षा आणि स्वप्नं यांना कुठंतरी मर्यादा घालावी. कारण आहे त्यात समाधान मानणारे लोकच आयुष्यात यशस्वी होतात. प्रेम, जिव्हाळा, माया, ममता, तत्त्व यांतून संसाररूपी घरकुल छान सजतं. एक एक काडी जमवून कष्टपूर्वक आपले घरटे बनविणारी चिमणी प्रत्येक संसारी माणसापुढे आदर्श उदाहरण आहे. एकूण काय, तर -

*पती-पत्नी नात्याला*
*सावरण्याची ओढ असते,*
*एकमेकांना सावरताना*
*सारे आयुष्य गोड होते..*

✾✾

सहा

# आला पाऊस पाऊस....

पाऊस... किती मोहक शब्द. मनामनाला मोहिनी घालणारा! पाऊस म्हणजे सृजनशीलता. पाऊस पडला की जमिनीतून हिरवे-पिवळे कोंब बाहेर डोकावतात, कोवळे नि लुसलुशीत गवत हिरव्या गालिच्याचं रूपडं घेऊन सजून जातं. पाऊस सर्वांना हवाहवासा वाटतो. मात्र तो सर्वात जास्त आवडतो, तो सृजनशील कवींना. कवींच्या सृजनशील मनात प्रतिभेच्या नवनवीन कोंबांचे अंकुर पाऊसच फुलवीत असतो.

पाऊस हा शब्द नुसता ऐकला तरी मन हिरवंगार होऊ लागतं. मनातही पावसाचा ओलावा निर्माण होतो. मनातला पावश्या त्याचं लवकरात लवकर आगमन व्हावं म्हणून शीळ घालू लागतो. मात्र तो मनकवडा पाऊस बिलंदर. खूप खूप वाट पहायला लावतो. अगदी चातकासारखा. असंख्य भेगा पडलेली जमीन, शुष्क डोळ्यांनी आभाळाकडे नजर लावून बसलेला बळिराजा, उन्हानं हैराण झालेले चराचर... सारे सारे त्याच्या वाटेवर डोळे लावून बसतात. त्याच्या न येण्याने विरहगाणे आळवतात-

*'मन झाले रे उदास*
*सतत तुझाच ध्यास*
*नाही सोसवत आता*
*तुझ्या विरहाचा त्रास!'*

असं आर्त विरहगाणं आळवलं की वाटतं, आता तो येईल. आपला अंत पाहणार नाही. ढग गडगडाट करू लागतात. वादळवारा घोंघावत वाहू लागतो. आकाशही झाकोळून येतं. त्याच्या येण्याची सारी चिन्हं दिसू लागतात. लहानपणापासून अनुभवलेला पाऊस आठवून मनात आठवणींचे मोर नाचू लागतात, पण थोड्याच अवधीत ढग गडगडाट करून निघून जातात. घोंघावत आलेला वादळवारा पावसाच्या ढगांना पळवून नेतो. तेव्हा मात्र पावसावरचा भरवसा उडून जातो; नि भर पावसाळ्यातही त्याची आठवण येत नाही. तेव्हाही शब्द ओठी येतात...

*'तुझिया न येण्यानं रे*
*माझी फाकली धरती,*
*माझ्या सानुल्या पिलांच्या*
*हाका आर्त कानी येती!'*



मन असं निराश झालं की त्याला आपली कणव येते. मग तो येऊ लागतो. थेंब... धारा... संततधार पाऊस आणि अविरत जलधारांचे मनमोहक नृत्य सुरू होते. सारी धरती ओलीचिंब होते. मनामनातही लक्ष लक्ष पाऊसधारा पडू लागतात. पावसाच्या एकेका थेंबातून सृजनता निर्माण होते. मग पावसाच्या थेंबांच्या लय, ताल आणि सूर यांच्या त्रिवेणी संगमात कवितेचे शब्दही आकार घेऊ लागतात. पाऊस सरींचे मनमोहक नृत्य पाहता पाहता तहानभूक, वेळकाळ कसलेही भान रहात नाही. नदीनाले तुडुंब भरून वाहू लागतात. हे क्षण टिपताना मनातले शब्दही कवितेतून बाहर पडतात...

*'आला पाऊस पाऊस*
*घेऊन रेशमांच्या धारा*
*माझ्या मनात नाचतो*
*मयुराचा तो पिसारा!'*

असा आनंद देऊन जाणारा पाऊस राजा प्रत्येकाला वेगवेगळा अनुभव देत असतो. पाऊस आणि धरती यांचं नातं असंच विविध प्रकारचं असतं. कधी पाऊसप्रियाची वाट पाहणारी धरती प्रेयसी असते, तर कधी कामाला किंवा शाळेत गेलेल्या पाऊसबाळाची वाट पाहणारी आणि त्याच्या भेटीची ओढ लागलेली धरती वात्सल्यमूर्ती माता असते, तर पाऊसवडील आषाढ-श्रावणातल्या सणांना आपल्याला घ्यायला येतील, अशी आतुरतेने वाट पाहणारी धरती मुलगी असते. तर रक्षाबंधनाला आपला लाडका पाऊसभाऊराया येऊन, आपली रेशीमराखी बांधून, सर्व प्राणिमात्रांना सुखी-समृद्ध करेल, असा विश्वास बाळगणारी धरती बहीण असते. अशी किती रूपं सांगावी, त्या धरतीला नखशिखांत चिंब चिंब भिजवणाऱ्या त्या पावसाची! या नात्याला खऱ्या अर्थानं वैश्विक नातं म्हणता येईल. प्रिय व्यक्तींच्या सोबत अनुभवलेल्या अनेक आठवणी मनात धिंगाणा घालतात, पावसातच! मनामनात पाऊसगाणी आठवून एकेक आठवण पाऊसगाण्यातून बाहेर येते.

*पाऊस तुझ्या सयीचा*
*मम हृदयी झंकारतो,*
*तुझ्या माझ्या मनातली*
*गाणी ओठी आळवितो!*

पाऊस म्हटलं की सृजनता, पाऊस म्हटलं की मनामनाची एकरूपता. धरतीप्रियाचं पाऊस प्रियकराशी होणारं मीलन म्हणजे पाऊस. पाऊस हा शब्द आठवला की, मुसळधार पावसात चिंब चिंब भिजलेले दिवस आठवतात. निथळत्या पाण्यातून होणारं नवनिर्मितीचं बीजारोपण आणि प्रेमातल्या आणाभाका घेणं आणि त्या आयुष्यभर निभावणं म्हणजे पाऊस!

अशा आठवणींनी मन चिंब चिंब भिजून जातं...

*'तूही ओली, मीही ओला*
*झाले सारे चिंब चिंब*
*निथळत्या पाण्यातून*
*रुजे जमिनीत कोंब!!'*

अशी त्याची विविध रूपं आणि दृश्यं प्रत्येक पावसाळी क्षण आठवताना आपल्या डोळ्यांसमोर उभी राहतात. कारण पाऊस असाच आहे. कधी अवखळ, कधी हळवा... कधी अबोल... तर कधी कवितेतल्या शब्दरूपी थेंबातून घरंगळत संततधार बरसणारा. त्याचं आगमन आणि निघून जाणं... या दोन्हीही गोष्टी मनाला हुरहूर लावून जाणाऱ्या. मात्र नवनिर्मितीच्या प्रत्येक क्षणाला संजीवनी देणाऱ्या या मांगल्यमूर्ती पाऊसराजाच्या चरणी ही पुष्पांजली अर्पण!

✤✤



सात

## सांगा कसं जगायचं?

मानवी जीवन हा सुख दुःखाच्या उभ्या आडव्या धाग्यांनी विणलेला रुमाल आहे. हा विचार आपण जीवन जगत असताना पदोपदी अनुभवत असतो. थोडं सुख मिळालं की, आपण हुरळून जातो. आकाश जणू ठेंगणं वाटायला लागतं. मात्र तेव्हाच एखादं दुःख किंवा समस्या आपल्याला जमिनीवर आणून ठेवते. हा नियतीचा खेळ म्हणायचा की, माणसाच्या मर्यादेचा पराभव. मात्र हेच खरं जीवन आहे. दुःख सोसण्याचं बळ आणि सुख उपभोगण्याची मनाची आतुरता जीवनाची घडी बसवते. कारण सुख उपभोगत असताना आयुष्याचा शेवट लांबत नाही आणि दुःखी असताना जीवनातला काही काळ थांबून राहात नाही. म्हणून सदैव आनंदी राहण्याचं टॉनिक माणसाला दुःखावर मात करायला शिकवतं, इतरांच्या दुःखात सहभागी व्हायला, इतरांच्या आनंदात आनंद मानायला शिकवतं.

काही वर्षांपूर्वी मुंबापुरीला महाभयानक महापुराचा असह्य तडाखा बसला. लाखोंच्या कौटुंबिक, सामाजिक जीवनाची वाताहात झाली. काही क्षणात डोळ्यादेखत सारं सारं उद्ध्वस्त झालं. दुःखाचा डोंगरच जणू साऱ्या मुंबापुरीवर कोसळला. मुंबईपासून दूर राहणाऱ्या आपल्यासारख्यांच्या अंगावर प्रसारमाध्यमांमधून 'आँखो देखा हाल' पाहताना काटे उभे राहिले. सारा महाराष्ट्रच नव्हे, तर भारत शोकसागरात बुडाला.

कवी गौरवकुमार आठवले यांनी म्हटल्याप्रमाणे-

*पावसाची तू नको गाऊस गाणी*
*मुंबईच्या दाटते डोळ्यात पाणी...*
*तू निसर्गाचा नको देऊ हवाला*
*फोल ठरते कैकदा आकाशवाणी...*

अशी अवस्था झाली.

मात्र 'एकमेकां साह्य करू, अवघे धरू सुपंथ' यानुसार स्वतःचा जीव वाचल्याचा आनंद, जणू काल काही घडलंच नाही, असा आविर्भाव चेहऱ्यावर दाखवत, नव्याने आपला संसार सर्वांनीच उभा केला. कुसुमाग्रजांनी 'कणा' कवितेत म्हटल्याप्रमाणे ''मोडून पडला संसार तरी, मोडला नाही कणा, पाठीवरती हात ठेवून नुसते 'लढ' म्हणा'' अशी एकमेकांना लढण्याची जिद्द देऊन गेला. उगवणारा प्रत्येक दिवस नवा उत्साह, नवी आशा-आकांक्षा

घेऊन आला. इतके स्वावलंबन निर्माण झाले, ते केवळ प्रबळ इच्छाशक्तीने. जीवनात अशी इच्छाशक्तीच आपलं आयुष्य घडवीत असते. एवढंच नाही, तर दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकी या औद्योगिकदृष्ट्या प्रगत शहरांवर अणुबॉम्बचा मारा करून सारं उद्ध्वस्त केलं, बेचिराख केलं. मात्र राखेतून जन्म घेणाऱ्या फिनिक्स पक्ष्याप्रमाणे थोड्याच काळात सारं जनजीवन सुरळीत झालं. साऱ्या जपानने औद्योगिकदृष्ट्या उत्तुंग झेप घेतली आणि तेथील जनजीवन अद्ययावत केलं, हेच खरं जीवन!

कॅन्सर, एड्ससारख्या महाभयानक, दुर्धर आजारांवर अजूनही रामबाण औषध निर्माण झालं नाही. उद्याचं मरण समोर दिसत असतानाही, अशा आजारांनी ग्रस्त असतानाही हास्यविनोदात रंगलेली माणसं खऱ्या अर्थानं जीवनाचा आस्वाद घेत असतात. शिल्लक राहिलेलं थोडंथोडकं आयुष्य आनंदात जगून घेतात. मात्र लहानसा किंवा साधासुधा आजार काही दिवस झाला, तरी माणसाला असह्य होतं. तो मरणाच्या गोष्टी बोलू लागतो. इतकेच नव्हे, तर 'या आजाराला वैतागलो बुवा! एकदाचं मरण आलं तर बरं' अशी वैतागी वाक्यं वापरतो, तेव्हा खरं जीवन कळत जातं. संकटकाळातही खंबीरतेची उभारी देणारं मन जीवनाची घडी विस्कटू देत नाही.

शरीरानं धडधाकट माणसं काहीही कामधंदा न करता हातावर हात ठेवून बसली आहेत, तर शारीरिक व्यंग असणारी अंधअपंग माणसं, अवघड वा सोपे कोणतेही काम न डगमगता करताहेत. व्यंगावर मात करणारी, जीवनाची लढाई जिंकणारी माणसं पाहिली की, नक्कीच मनाला समाधान वाटतं.

श्रीमंतांची मुलं आईवडिलांच्या कमाईवर रात्रंदिवस मजा मारताहेत, अभ्यासात लक्ष न देता शाळा-महाविद्यालयात उडाणटप्पूपणा करताहेत, कोणतंही कर्तृत्व नसल्यानं स्वत:चं भविष्य बिघडवताहेत. मात्र गरिबी पाचवीला पुजलेली असतानाही 'कमवा आणि शिका'-नुसार आपल्या पालकांबरोबर काबाडकष्ट करून, संसाराचा गाडा ओढणारी आणि तन्मयतेने उच्चविद्याविभूषित असूनही कोणाचीही, कोणतीही कुबडी न घेता, स्वकर्तृत्वावर नोकरी वा उद्योगधंदा करणारी माणसं पाहून, गरिबीची जाणीव असणारी माणसंच कर्तृत्ववान निघताहेत, हे चित्र समाधानकारकच नव्हे, तर अनुकरणीय आहे, असे वाटल्यावाचून राहात नाही. जी माणसं स्वत:साठी न जगता समाज, देश आणि साऱ्या जगाच्या सर्वांगीण कल्याणासाठी झटतात, स्वत:च्या जिवाची पर्वा न करता, इतरांना संकटातून वाचवतात. वेळप्रसंगी स्वत:च्या प्राणाचं बलिदान द्यायलाही मागे-पुढे पाहत नाहीत. 'मी जिवंत राहण्यापेक्षा, माझा देश जिवंत राहायला हवा!' 'देश टिकला तर मी टिकेन!' 'देशापुढे माझे अस्तित्व शून्य आहे!' अशी जाज्वल्य विचारसरणी असणारे समाजपुरुष आपल्यासमोर



दीपस्तंभासमान मार्गदर्शक आहेत. निरपेक्ष भावनेने प्रत्येक कार्य प्रामाणिकपणे करून जीवनाचा खऱ्या अर्थाने ते उपभोग घेत आहेत. अशा सर्व जीवनानंदाचा खळाळता झरा असणारे सारेच जीवनाचं आनंददायी तत्त्वज्ञान मनापासून समजणारे असल्याने, आपणही असंच प्रेरणादायी, अनुकरणीय जीवन जगायला हवं.

*'सांगा कसं जगायचं?*
*कण्हत कण्हत की गाणं म्हणत!'*

कविवर्य मंगेश पाडगावकरांच्या या कवितेचा मथितार्थ ज्याला कळला, त्याच व्यक्तीला जीवनात अनेक संकटांवर मात करून, जीवनातला खरा आनंद लुटताना लाभतं मनमुराद हसणारं आनंददायी गाव!

✾✾

आठ

# बिन तेरे जिया जाये ना...

'मीलन' आणि 'विरह' या प्रेमरूपी नाण्याच्या दोन भावनिक बाजू आहेत. तिचा विरह जाणवू लागल्यावर तर तिच्या आठवणी मनात रुंजी घालू लागल्या. ती येण्यापूर्वी समोर खूप खूप बोलावंसं वाटतं; पण काय नि किती बोलू, असं ती समोर आली की, होऊन जातं. परवाच दूरदर्शनवर अमिताभ आणि हेमामालिनीची विरहव्याकूळ कहाणी 'बागबान'मध्ये बघितली आणि तिच्या आठवणींनी मनात धिंगाणा घालायला सुरुवात केली. 'बागबान'मधलं विरहाची कैफियत मांडणारं अतिशय अर्थपूर्ण गाणं कानावर पडल्यापासून तर चैनच पडत नाहीये...

*मै यहाँ तू वहाँ जिंदगी है कहाँ*
*तू तूही है सनम देखता हूँ सनम*
*नींद आती नही याद जाती नही*
*बिन तेरे अब जिया जाये ना...॥*

गाणं ऐकलं आणि प्रत्येक शब्दागणिक तिचं माझ्या हृदयात सामावलेलं रूप साक्षात डोळ्यांसमोर दिसू लागलं. एकेक शब्द तिची आठवण करून देणारा होता. रात्रभर डोळ्याला डोळा लागला नाही. तिच्या नसण्यानं जाणवणारं एक अस्वस्थ हुरहूर लावणारं पोरकंपण आर्त स्वरात अमिताभ आणि हेमा एकमेकांना आपल्या भावना व्यक्त करताना पाहून तिच्या आठवणींनी डोळ्यात गर्दी केली. नकळत दोन अश्रू ओघळले. आठवांचा बांध फुटला. कदाचित तिलाही माझी आठवण येत असेल, असं उगीचच वाटून गेलं. तिच्यासोबत घालवलेले अनेक क्षण डोळ्यांसमोर चित्रपटासारखे सरकत सरकत पुढे जाऊ लागले. ती नसताना तिच्या प्रतिमेशी खूप खूप बोलायचो. तिचा विरह सहन होत नसायचा. मात्र समोर आली की, 'तेरी भी चूप, मेरी भी चूप' असा चुपके चुपके खेळ चालायचा. ती निघून गेल्यावर भावना अनावर होऊन आठवणींचे पक्षी गोळा व्हायचे. तिच्या विरहातही तिला भेटण्याची ओढ असायची. मीलनाचं सुख आणि विरहातलं दुःख या दोन्ही भावना तशा मोजक्या शब्दात पकडणं महाकठीण. अगदी समुद्राची शाई केली आणि आकाशाचा कागद केला तरी या भावनांना पूर्णांशाने मांडणं ही अशक्यप्राय गोष्ट.

कधी कधी विचार येतो की, या जगात प्रियकर-प्रेयसी, पती-पत्नी या प्रेमळ नात्यांच्या



भावना इतक्या वेगळ्या कशा? तिचं वागणं, तिचं बोलणं, तिचं हसणं आणि तिचं नसणं सारं सारं माझ्या आकलनशक्तीपलिकडचं. तिच्या मोहक अदांची स्तुती तिच्या प्रतिमेसमोर करताना तासनूतास बसून गप्पा मारण्याची गंमत कशी काय जमते बुवा? हे त्या विधात्यालाच माहीत. तिच्या विरहात रात्ररात्रभर जागे राहिल्यावर होणारी प्रकृतीची हेळसांड, ती प्रचंड थकव्याची जाणीव तिच्या एका दिसण्यानं कुठल्या कुठे पळायची. अशी काय विलक्षण जादू होती तिच्या डोळ्यात? पण एका नजरेनं घायाळ होणारी माझ्यासारखी माणसं अमिताभ - हेमाच्या चिरतरुण प्रेमाचीच जणू झलक दाखवत होते.

आयुष्यातल्या सुखद क्षणांचा कप्पा ज्या निवांतवेळी मी उघडून बसतो, त्या त्या वेळी तिच्या प्रत्यक्ष भेटीपेक्षा मला तिचा विरहच अधिकच साद घालीत असतो. अस्वस्थता ही नवनिर्मितीची द्योतक आहे, असं म्हणतात. तिचं नसणं, हेमा आणि अमिताभचे पाणावलेले भावनाविवश डोळे जणुकाही माझ्याही डोळ्यांच्या पापण्यांना ओलावून जात होते. मनातल्या आठवांनी शब्दांचा सहारा घेतला...

*तुझा विरह असा की*
*मनी काहूर उठावे*
*तुझ्या प्रेमळ मिठीत*
*आयुष्याचे गाणे व्हावे ।*

✾✾

नऊ

# मन उधाण वाऱ्याचे...

'मन करा रे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण!' हे वचन ऐकलं की मनात एकप्रकारचे चैतन्य, आनंदाची जाणीव उत्स्फूर्तपणे निर्माण होते. साऱ्या असाध्य रोगांवरचं एकमेव रामबाण औषध म्हणजे 'मनाची प्रसन्नता!' ज्याने सदैव मन प्रसन्न ठेवण्याचं टॉनिक घेतलं आहे ना, तो माणूस कोणत्याही संकटात खचून जाऊ शकत नाही. इतकी खंबीरता त्याच्या अंगी येते, ती केवळ मनाच्या प्रसन्नतेमुळेच!

ग्रामीण भागातील शाळेत अध्यापनाचे काम करताना अशा प्रसंगांना सामोरे जावे लागले आहे. राब राब राबणाऱ्या कष्टकरी शेतकऱ्यांच्या मुलांकडे ग्रहणक्षमता चांगली असते. मात्र 'शिक्षण की शेती' यामध्ये ते भरडले जातात. विशेषत: हुशार असूनही इयत्ता दहावीच्या परीक्षेत चांगले गुण न मिळाल्याने निराश होणारी ही मुलं निराशेच्या गर्तेत सापडून स्वत:च स्वत:वर दु:ख, संकटं ओढवून घेतात. मात्र ज्यावेळी अशा गोष्टी समजल्या की आपण त्यांना उभारी देण्याचं काम करायलाच हवं.

एक मुलगा दहावीला होता. प्रथमपासून हुशार. ८०-८५ टक्क्यांपेक्षा कमी गुण कधी त्याला पडले नाहीत. मात्र दहावीच्या परीक्षेत त्याला ६०-६५ टक्के गुण मिळाले. तो खूप नाराज झाला. कोणाशी बोलेना, घराबाहेर पडेना. एकप्रकारची विषण्णता त्याला आली होती. नानाविध वाईट विचार त्याच्या मनात येऊ लागले. त्याचे एक पत्र मला मिळाले. त्यात त्याने मनातल्या साऱ्या भावनांना मोकळी वाट करून दिली. पत्र वाचून मलाही खूप वाईट वाटले. काय करावे? काही सुचेना.

''जीवनाची वाटचाल करताना अपयशाचा टिळाच जणू माझ्या भाळी कोरलेला आहे. जशी मी प्रगतीच्या दिशेने वाटचाल करू पाहतो, तसतसे अपयशच माझ्या हाती येत आहे. त्यामुळेच आता माझ्या या 'सागराएवढ्या अफाट' दु:खाच्या केवळ या चार भिंतीच सोबती बनल्या आहेत.'' असे त्याच्या मनाची घालमेल सांगणारे विचार वाचून क्षणभर मलाही काय करावे, ते सुचेना. परंतु मी विचार केला, की अशी अवस्था कित्येकांवर येते. त्यातून काहींना मार्ग सापडतो, काही वाममार्गाला लागतात. काहींना जीवन नकोसं होतं. पण माझ्या या लहानग्या मित्रानं आपलं मन तरी पत्राद्वारे मोकळं केलं. त्या पत्राद्वारे त्याचं दु:खी मन मोकळं झालं होतं, असं मला वाटतं.



ही घटना सांगण्याचे कारण म्हणजे त्याच्या मनावर आलेले अपयशाचे दडपण. मात्र त्याने हेही लक्षात घ्यायला हवं, की परीक्षेत गुण खूप मिळाले म्हणजे तो जीवनात यशस्वी होतोच असे नाही. तर जीवनाच्या इतर क्षेत्रात स्वत:च्या अक्कलहुशारीनं नाव कमविणारेच सदैव यशस्वी होतात. ही मनाची प्रसन्नता आणि यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली केवळ वाचन, क्रीडानैपुण्य, साहित्यनिर्मिती, कलाकौशल्य, यांद्वारे मिळू शकते. शिक्षणाद्वारे पढवलेले पंडित किंवा बोलके पोपट तयार होण्यापेक्षा हिंमतीने, स्वत:च्या पायावर उभी राहणारी तरुणाई हीच देशाची खरी संपत्ती आहे. मन, मेंदू आणि मनगट बळकट असणारा समाज मनाच्या प्रसन्नतेशिवाय बनूच शकत नाही. पुस्तकी कीडा व्यवहारज्ञानात शून्य असतो. एकदा अपयश आले म्हणून खचून न जाता, पुन्हा यशाची शिडी धरून धाडसाने यशाचा आनंद मिळवायला हवा.

आयुष्यात दु:खाचा डोंगर पचविल्याशिवाय सुखाचा मन प्रसन्न करणारा झरा निर्माण होत नाही. रामाने वनवास, पांडवांनी अज्ञातवास सहन केल्यानंतरच त्यांच्या आयुष्यात सुखाची हिरवळ निर्माण झाली. म्हणूनच मनाची प्रसन्नता अपयश पचविण्यासाठी ताकद देते. यशाची चव चाखण्यासाठी लागणारी ताकद देते. मन चंगा, तो कठौती मे गंगा. तुमचं मन पवित्र, निर्मळ असेल, तर आयुष्यात कधीही वाईट विचार तुमच्या मनाला शिवणार नाहीत. हाच मनाच्या प्रसन्नतेचा खरा अर्थ आहे. उदात्त, नि:स्वार्थी देशसेवकांनी स्वातंत्र्यासाठी हसत हसत आपल्या प्राणाचे बलिदान आपल्यासाठी करणाऱ्या आणि देशप्रेमासाठी हसत हसत फासावर जाणाऱ्यांची मनाची प्रसन्नता खऱ्या अर्थाने महान होती. मनाची प्रसन्नता प्रत्येकाने ठेवल्यास येणारा भावी काल अतिशय उज्ज्वल आहे.

मनाचा थांगपत्ता काहीकेल्या लागत नाही. प्रत्येक प्रसंगात मनाची भूमिका बदलत राहते. प्रेम आणि जिव्हाळ्याने मनाची कळी खुलते; तर द्वेष आणि रागाने मन:स्ताप होतो. शेवटी आपण मनाची प्रसन्नता कशी टिकवायची, हे आपणच ठरवावं. कारण...

*'मायेच्या हळव्या स्पर्शाने खुलते*
*नात्यांच्या बंधात धुंद मोहरते*
*मन उधाण वाऱ्याचे, गूज पावसाचे...*
*का होते बेभान कसे गहिवरते...*
*मन उधाण वाऱ्याचे... ... ...'*

✾✾

दहा

# प्रवास

प्रवास... माणसाच्या आयुष्याला खऱ्या अर्थानं सोनेरी झळाळी आणणारा तीन अक्षरी मनोहारी शब्द. हा शब्द नुसता उच्चारला तरी मस्तपैकी फिरून आल्यासारखं प्रसन्न नि आल्हाददायक वाटतं. इतकी मोहिनी प्रवासानं प्रत्येक प्राणिमात्रावर घातली आहे. प्रवासानं मानवी जीवनाचं सार्थक होतं. आपण केलेला प्रवास आणि त्या प्रवासादरम्यान अनुभवलेले वेगवेगळे अनुभव हा स्वतंत्र संशोधनाचा विषय ठरत असतो. कारण प्रवासामुळे येते बहुश्रुतता, व्यासंगी चौकसपणा. रेल्वे, बस अथवा कोणत्याही वाहनाने प्रवास करताना मागे जाणाऱ्या इतर गाड्या, ठिकाणं, जणुकाही आपल्याला सलाम करून जात असतात आणि आपण सतत पुढे जात राहतो. 'काळ मागे लागला; थांबला तो संपला, कायदा पाळा गतीचा' या उक्तीनुसार जीवनातील गतिमानता, सातत्याने प्रगतीची वाटचाल करायला शिकवतो, तो प्रवास. विकासाची गंगोत्री खुली करण्याची सारी सूत्रं प्रवासाकडेच असतात.

'मुसाफिर हूँ यारों, ना घर है, ना ठिकाणा, मुझे चलते जाना है, बस चलते जाना।' असं म्हणत फिरस्ता असलेला हिंदी चित्रपटसृष्टीतील नायक किंवा

*'प्रवासी मी दिगंताचा;*
*युगे युगे माझी वाट*
*मज चालायचे असो;*
*सुख-दुःख, माळ-घाट!'*

असं गीतकार राम मोरे यांच्या गीतातला नायक माणसाचं नातं युगायुगाशी जोडण्याचं काम करतो. जे ठिकाण माहीत आहे, त्याचा प्रवास करण्यापेक्षा अनोळखी ठिकाणांचा प्रवास करणं, हे आव्हान असतं. तेथील नवीन लोक, त्यांची संस्कृती, बोलली जाणारी भाषा या साऱ्या गोष्टी अनुभवताना मिळणारा आनंद आणि चांगल्या गोष्टी ग्रहण करताना होणारा अभ्यास आनंददायक असतो. स्वतःचे निर्णय स्वतः घेण्याची क्षमता, निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेण्याची आवड जोपासणारा प्रवास हा सृजनशील लेखन करणाऱ्या लेखकाला घडवितो. त्याच्या लेखणीला ऊर्जा पुरवितो. त्याच्या लेखनातून जगण्यातला उच्च प्रतीचा आनंद मिळवून देण्याची उभारी प्रवासामुळेच तर मिळते.

एवढंच काय, आपलं आयुष्य हाही एक प्रवासच आहे ना! छोटंसं बाळ म्हणून जन्माला



येणं, तारुण्य, प्रौढ या अवस्थांपासून वृद्धापकाळाकडे जाऊन शेवटचा प्रवास अंत्ययात्रेपर्यंत अनेकविध अनुभवांनी जगण्याचा प्रवास घडत असतो. सर्वोच्च आनंदाचे क्षण आपापसात वाटून घ्यायचे असतील, तर प्रवास जरुर करावा. त्याचबरोबर दुःख हलके करण्यासाठीही निसर्गसौंदर्याचा अद्भुत आविष्कार पाहून चिरकाल शांती आणि सुखाच्या वाटेचा शोध घ्यावा. आजाराने त्रस्त झालेल्या माणसाला हवापालट करण्याचा सल्ला डॉक्टर देतात, तो केवळ प्रवासादरम्यान मिळणाऱ्या आनंदामुळेच ना! नुकत्याच संसाररूपी रथाचा प्रारंभ करणाऱ्या नवदाम्पत्यालाही विवाहानंतर लगेचच प्रवासासाठी हनिमूनला पाठविण्यामागेही एकमेकांना समजून घेणे, एकमेकांच्या आवडीनिवडी माहीत होण्यासाठी त्या नाविण्यपूर्ण मधुचंद्राच्या प्रवासाने मदत होते.

आपला खंडप्राय असलेला भारत विविध संस्कृतींचा मिलाफ असलेला देश आहे. प्राचीन भारतीय शैली दाखविणारी अनेक ठिकाणं भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहेत. असा चिरंतन ठेवा मनाच्या गाभाऱ्यात जपून ठेवण्यासाठी आपण प्रवासाची योजना आखायला हवी. जगातले सारे महापुरुष अखंड प्रवासानेच विचारवंत बनले. सातत्याने नाविण्याचा शोध घेत, प्राचीन संस्कृतीचा अभ्यास करत-करत, इतिहासाचा अनमोल ठेवा त्यांनी आपल्या प्रवासादरम्यान अनुभवला, तो शब्दबद्ध केला आणि प्रवासाची नवी दालनं आपल्याला खुली करून दिली. म्हणूनच प्रवासाची शिदोरी ज्याच्याजवळ आहे, तो खरोखरच भाग्यवान आहे.

चला तर मग आपण आज नव्या आव्हानात्मक ठिकाणाचा प्रवास करायला सुरुवात करूया!

✽✽

अकरा

## जीवनगाणे... गातच रहावे!

*'जन पळभर म्हणतील हाय हाय*
*मी जाता राहील कार्य काय?'*

या कविवर्य भा.रा. तांबे यांच्या ओळी ऐकल्या की, माणसाचं; स्वत:ला महान मानणाऱ्या साऱ्यांचं खूप खूप हसू येतं. स्वार्थासाठी स्वत:च्या रक्ताच्या नात्याचा बाजार मांडणाऱ्या माणसाचा, त्याच्या निधनानंतर थोडे दिवस आठवण काढणाऱ्या आप्तस्वकीयांचा विचारही मनात विचारांचं वादळ उठवतो. स्वत:च्या कर्तृत्वावर, घामाच्या दामावर, विश्वास ठेवण्यापेक्षा माणूस 'आयत्या बिळावर नागोबा' न्यायाने थोड्या श्रमात किंवा थोड्या काळात जास्त पैसा मिळविण्याच्या स्पर्धेत स्वत:चं स्वास्थ्य हरवू पाहतोय.

शांतता, आरोग्यवर्धकता, आराम, सौख्य या बाबी माणसाचं आयुष्य दीर्घकाळ टिकविण्यासाठी महत्त्वाच्या आहेत. मात्र वाढती गर्दी शारीरिक आणि मानसिक अवस्था बिघडवण्यासाठी कारणीभूत ठरत आहे.

*'या जन्मावर या जगण्यावर*
*शतदा प्रेम करावे...'*

या कविवर्य मंगेश पाडगावकरांच्या गाण्यातील ओळी माणसाच्या हसतखेळत जीवन जगण्याला दिशा देतात. आनंद हा दुसऱ्याच्या आनंदात आपण मानायचा असतो. 'दोन घडीचा डाव; याला जीवन ऐसे नाव' अशा ओळी आपल्याला हेच दर्शवितात की, मनुष्याचा जन्म हा केवळ फुशारक्या मारण्यात आणि याच्या-त्याच्या उखाळ्या-पाखाळ्या काढण्यात न घालवता सत्कार्यासाठी उपयोगी पडावा. सुगंधी फुलासारखं कधी गळ्यात हार बनून; तर देव्हाऱ्यातल्या देवाला वंदन करताना आपलं जीवन समर्पित करावं. सदैव हसतमुख राहिल्यानं आपण निरोगी राहतो. कोणताही रोग चिंता, कटकटी आणि अतिलोभाने होतो. म्हणून चिंतामुक्त, कटकटीविना जीवन आणि मिळालं त्यात समाधान मानण्याची वृत्ती सर्वत्र निर्माण झाली तरच मानवजन्माचे खऱ्या अर्थाने सार्थक होईल.

सतत हसतमुख राहिल्याने मिळणारा चिरकालचा आनंद शब्दातीत असतो. 'जीवनगाणे... गातच रहावे' असे म्हणत म्हणतच जीवनाची वाटचाल करावी आणि सुखी-समाधानी वृत्तीने जीवनाची भविष्यकालीन तरतूद आनंदमय करावी. आनंद घ्यावा, आनंद वाटावा.



जुनी गाणी, लोकगीतं, भावगीतं, भक्तीगीतं जो आनंद देतात, तो आनंद मनमुराद उपभोगावा. सुखाचे दोन निवांत क्षण अनुभवावे. धावपळ-कटकटी तर असतातच, त्यांना खंबीरपणे सामोरे जावे. हलक्याफुलक्या साहित्याचा आस्वाद घ्यावा. अधूनमधून विचारांना चालना देणारे लेखन वाचल्याने विचारांची प्रगल्भता वाढते.

साहित्यिकांना आलेले अनुभव वाचल्याने आपल्याला त्या अनुभवांची शिदोरी मिळते. भविष्यातील मार्ग प्रकाशमान होण्यासाठी प्रेरणा मिळते. साहित्याने समाजात क्रांती घडविली आहे. समाजाला प्रगतीची दिशाही दिली आहे आणि मानवी मनाचे विविध कंगोरेही रसिकवाचकाला उलगडवून दाखविले असल्याने मानवी मनाच्या कप्प्यात आनंददायी जीवनाचा शिडकावा निरंतर होत राहील.

✾✾

बारा

## सय पुन्हा येणे नाही...

*'खूपदा तुझ्या आठवणी*
*पावलं न वाजवता येतात,*
*आणि जाताना माझ्या*
*मनाला पावलं जोडून जातात!'*

कवयित्री शोभा बाविस्कर यांची ही चारोळी डोळ्यासमोर आली की, तिची आठवण जागी होते. ती अशीच सोज्वळ, निरागस, दिसायला छान. वागण्यात कधी-कधी खूप मोकळी, तर कधी अतिशय अबोल; काहीही न बोलणारी, संपूर्ण आयुष्यभर पुरून उरणारी साऱ्या नात्यांची शृंखला तिने मला बहाल केली. विश्वास आणि श्वासाच्या प्रत्येक नात्याला गुंफताना आजही ती अदृश्यरूपाने मला सतत तिच्या सहवासातील कडू गोड आठवणींचा शिडकावा देते आहे.

शिक्षणाच्या निमित्ताने बाहेरगावी, अगदी नवीन ठिकाणी तिने मला स्वत:ची ओळख दिली. अनोळखी मोहमयी मुंबई नावाच्या मायानगरीत तिने मला सर्वांपेक्षा जवळ केलं. पूर्वायुष्यात घडलेल्या काही गोष्टी तिने मला जाणवू दिल्या नाहीत. जगताना आहे त्यात आणि मिळालं त्यात आनंदसुख मानण्याची प्रगल्भता तिने दिली. कितीही रागावलो, चिडलो, तरी स्वत: शांत, हसरी राहून माझा राग दूर पळविणारी ती, आज माझ्यापासून कित्येक क्षण, कित्येक मैल आणि कित्येक वर्षांपासून दूर आहे.

माझं मन मात्र तिच्या सहवासातला प्रत्येक क्षणन् क्षण, त्यावेळी मिळालेली स्वर्गीय अनुभूती आजही आठवू पहात आहे. एखाद्या निष्णात चित्रकाराने हुबेहूब चित्र काढावं, तशी तिच्या सहवासातील अनेक चित्रं एकामागून एक माझ्या मन:चक्षूंसमोर रांगेने उभी राहताहेत. आठवणींच्या हिंदोळ्यावर माझं मन झुलतं आहे.

आयुष्यातला प्रेमाचा नि वात्सल्याचा दुग्धशर्करायुक्त आनंद केवळ माझ्याच वाट्याला आल्याचा तो आनंद शब्दातीत आहे. तरीही तिची आठवण आली की मन व्याकूळ होतं. तिचा विरह जाणवू लागतो. तिच्याविना जीवन नीरस वाटू लागतं. तिच्या आठवणींचे पक्षी काळजात कलकलाट करतात.

एखाद्या जादुगाराने जादूची कांडी फिरवावी, तशी ती माझ्या आयुष्यात आली. तिच्या



सहवासातला प्रत्येक आनंदाचा क्षण देऊन अवघ्या काही महिन्यात ती मला सोडून निघून गेली. मला मात्र आयुष्यभरासाठी आठवणींचं हिरवंगार गाठोडं देऊन गेली. रोज येणारी तिची आठवण, क्षणाक्षणाची साठवण बनत गेली. इतकी कोणती जादू माझ्यावर तिने केली कोण जाणे? निर्मळ मन आणि निर्व्याज प्रेम यांचा दुहेरी संगम असणारी माझी सखी माझ्या आयुष्याला आकार देता देता स्वत:च अदृश्य होऊन गेली. ती नसताना खूपकाही बोलायचं ठरवायचो आणि समोर आली की काय बोलावं ते कळत नसायचं. आणि आज तर ती नाहीच, कधीच पुन्हा भेटणार नाही, बोलणार नाही, हे माहीत असूनही तिच्या अनेक आठवणींनी मनात काहूर माजलं आहे. माणसाचं असंच असतं. जेव्हा जवळ असतं, तेव्हा महत्त्व कळत नाही, अन् जवळ नसलं की संपूर्ण आयुष्याचं महत्त्वच कमी झाल्यासारखं वाटतं. आता तर तिची आठवण कधीही मनात न आणण्याचं मी ठरवतो. मात्र तिचं अस्तित्व, तिची भेट आणि तिचं सर्वकाही माझा पिच्छाच सोडत नाही. कारण ती तशीच होती, माझ्या आयुष्यातून कधीही न जाणारी नि आयुष्यभर काळजात जपलेली एक सोनेरी आठवण! मात्र तरीही मी म्हणत राहतो...

*दिस गेले, गेले मास*
*आता उरले ना काही*
*तुझी वाट पाहण्याची*
*सय पुन्हा येणे नाही!*

✾✾

तेरा

# ऋतू हिरवा... ऋतू बरवा!

तो आला, त्यानं पाहिलं अन् त्यानं जिंकलं! होय, पाऊस धोऽऽधो बरसतोय. चिंब-चिंब भिजवतोय. संततधार किंवा थोडासा उघडून भिजपाऊस पडतोय. सर्वत्र हिरवी मखमल पसरवणाऱ्या पावसानं, साऱ्या सृष्टीला नखशिखांत भिजवून हिरवंगार करून टाकलंय.

*'हिरवे हिरवे गार गालिचे*
*हरित तृणाच्या मखमालीचे'*

बालकवींच्या या प्रसिद्ध ओळी खऱ्या अर्थानं 'याचि देही, याची डोळा' अनुभवण्याचा हा नयनरम्य काळ! सारी सृष्टी हिरवाईची मऊशार शाल पांघरून आपल्या स्वागताला सज्ज झाली आहे. 'ऋतू हिरवा... ऋतू बरवा' म्हणत या हिरवाईचा बहर कवेत घेण्यासाठी आणि मनात सदैव साठवण्यासाठी आपणही उतावीळ झालो आहोत. समृद्धी, सोज्वळता आणि सुखाचं प्रतीक असलेल्या या हिरव्या रंगाचे हिरवेपण पाहिल्यावर प्रत्येकजण आपलं दुःख विसरून जातो. विज्ञानानं निसर्गावर मात करण्याच्या कितीही वल्गना केल्या, तरी तो निसर्गराजा अजूनही अजिंक्य आहे. याचं प्रतिबिंब म्हणजे ही हिरवाई! असं म्हणतात ना, की छटाकभर सुख किलोभर दुःखाला क्षणात हलकं करून टाकतं. तद्वतच ही हिरवाई आयुष्याला प्रसन्नमय आकार देते. तन-मन व्यापून आनंदाची तेजोमयी बरसात करते. उन्हाने होरपळणारे जीव, आभाळाकडं पाण्याची याचना करणारी धरणीमाय सारे सारे हिरवाईच्या संगीतात, सुवासात मनमुराद नाचतात, बागडतात. 'आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहीकडे' म्हणत साऱ्या सृष्टीला लाभलेली हिरवाई शब्दांतून व्यक्त होते...

*तूही ओला, मीही ओली*
*झाले सारे चिंब चिंब,*
*निथळत्या पाण्यातून*
*जमिनीत रुजे कोंब!*

पाण्याचा थेंब न् थेंब प्राशून तृप्त झालेली ही मनस्वी हिरवाई सृजनशीलतेचं बीज घेऊन येते. वर्षभर पिकणाऱ्या धनधान्याचं उराशी बाळगलेलं बळिराजाचं स्वप्न पूर्णत्वाकडं नेण्याचं आशादायक वातावरण निर्माण करते. हिरवाईच्या बहराला मांडणाऱ्या रचनाही जन्म घेऊ लागतात. मनामनातला हिरवा आनंद पाझरू लागतो...



*आला पाऊस पाऊस*
*उगवाया हिरवळ,*
*पाणी पाहता पाहता*
*सरुनिया गेली वेळ!*

असा मन प्रसन्न करणारा हिरवेपणा पुढच्या पावसाळ्यापर्यंत विरह सोसण्याचं बळ देतो. सृजनशील लेखक तर हिरवाईची मनस्वीपणे पूजा करणारा पुजारी बनतो. पर्जन्यरूपी देव नवनिर्मिती करणाऱ्या लेखकरूपी भक्ताला, पुजाऱ्याला पावण्याची मनीषा मनाशी बाळगूनच त्या हिरवाईचं रूपडं मनात साकारत असतो. किंबहुना, निसर्गाची कृपा स्वतःला सर्वज्ञ समजणाऱ्यांनाही शिकवण्यासाठीच आहे. दुटप्पीपणा, स्वार्थपरायणता, राक्षसी वृत्ती, गुन्हेगारी प्रवृत्तींवर मात करून, निसर्ग जसा आपल्या जादूनं प्राणिमात्रांना तृप्त करतो, तसं तृप्त केलं पाहिजे, साऱ्यांना सुखी-समाधानी ठेवलं पाहिजे. ही पृथ्वी सुजलाम - सुफलाम करण्याच्या केवळ गप्पा न मारता, वृक्षारोपण करून, स्वतःच्या मुलाप्रमाणं या वृक्षवल्लींचा सांभाळ करून हिरवाई सदा सर्वकाळ जिवंत ठेवली पाहिजे. उघडे बोडखे डोंगर, पर्वत टक्कल पडल्यासारखे दिसत आहेत, ही विद्रूपता दूर करून हिरवेपणा निर्माण करणारा हा पर्जन्यराजा सतत टवटवीत राहून, सर्वांना प्रगतीची, नाविण्याची, सृजनशीलतेची प्रेरणा देत राहील...

*वाटे सर्वा नवलाई*
*पाहून ही हिरवाई*
*हिरवाईनेच फळे*
*प्राणिमात्रांची पुण्याई!*

✾✾

चौदा

# दिसामाजी थोडे वाचीत जावे!

'वाचाल तर वाचाल!' या उक्तीतून वाचनाचा यथोचित गौरव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला आहे. एकाच शब्दाच्या दोन अर्थांमधून वाचनाचे अनेक फायदे दिसून येतात.

मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी म्हणजेच मनोरंजन, व्यासंगी वृत्ती आणि बुद्धीच्या प्रगल्भतेसाठी वाचन महत्त्वाचे आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे आणि स्पर्धेमुळे 'हे विश्वचि माझे घर' म्हणणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या स्वप्नातील जग विविध भेदांमध्ये, अमानुषतेमध्ये विभागले गेले आहे. कारण स्पर्धेच्या नावाखाली विधायक समृद्धीपेक्षा विघातक व विद्ध्वंसक प्रवृत्तीमुळे, वैयक्तिक स्वार्थामुळे जगाचा नाश होण्याची भीती निर्माण झाली आहे. 'गर्दीच गर्दी चोहीकडे, गेला माणूस कुणीकडे' या न्यायाने माणूस स्वत:बरोबरच कुटुंबापासून आणि दुसऱ्यांपासून दूर चालला आहे. या सर्वांमुळे धोक्यात आलेली मन:शांती देणारा एकमेव रामबाण उपाय म्हणजे 'वाचन!'

मनाला तजेला देणारे आणि मनाला सदैव विधायक, चैत्यन्यदायी बनविणारे वाचन सातत्याने केल्यास मनाची शांतता अबाधित राहते. जीवनात दररोज अनेक लहानमोठ्या अडीअडचणींना तोंड द्यावे लागते. त्यावर वेळेवर काहीएक उपाय न सुचल्यास मन:शांती बिघडून, हातून एखादी अक्षम्य चुकीची घटना घडून माणूस स्वत:चं बरंवाईट करून घेतो. परिणामी स्वत:बरोबरच कुटुंबाचाही विनाश करून घेतो. अशावेळी वाचन योग्य मार्ग दाखविणाऱ्या गुरुचे काम करते. किंबहुना संसारात येणाऱ्या अडीअडचणींवर मात करताना वाचनाचा फायदा पदोपदी होतो. नवरा-बायकोचे कडाक्याचे भांडण, त्याचा मुलांवर होणारा परिणाम कौटुंबिक स्वास्थ्य बिघडून टाकते. मात्र वाचनाने समंजस असलेली व्यक्ती भांडण टाळते. चूक तुझी की माझी? यावर निरर्थक वाद घालण्यापेक्षा मनावर एकाग्रतेने शांतता ठेवून क्रोधावर विजय मिळवते. त्याचबरोबर वाचनामुळे स्वत:ला विविधांगी ज्ञान मिळविल्याचा खरा आनंदही मिळतो.

*ग्रंथ हेच गुरु । ग्रंथ वाटसरू ।*
*ग्रंथचि आधारू । सर्वांचाच ॥*

असा वाचनाचा मानवाला होणारा फायदा एखादी गोष्ट करावी किंवा करू नये याची तार्किकता, गुरुच्या ज्ञानाचा होणारा फायदा केवळ वाचनाद्वारेच होतो. आयुष्यभर वाचनच मार्गदर्शक दीपस्तंभ बनू शकतो. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात मातापिता आणि गुरुजनांबरोबरच ग्रंथ हेही वंदनीय आहेत. कारण ते वाट चुकलेल्या वाटसरुला ज्ञानमय वाट दाखवतात. कामचुकार माणसाला कर्तृत्ववान व्यक्तीच्या आत्मचरित्रांच्या माध्यमातून कार्यप्रवण करतात.



जीवन कसं जगावं? याचा आदर्श वस्तुपाठ देणाऱ्या आणि खऱ्या अर्थाने आयुष्य अनुभवसंपन्नतेने जगलेल्या थोर व्यक्तींची चरित्रं आपण जरूर वाचायला हवी. डॉ. नरेंद्र जाधव (आमचा बाप आणि आम्ही), आचार्य अत्रे (कऱ्हेचे पाणी), राष्ट्रपिता महात्मा गांधी (माझे सत्याचे प्रयोग), लक्ष्मण माने (उपरा), प्रा. दादासाहेब मोरे (गबाळ), लक्ष्मण गायकवाड (उचल्या), शंकरराव खरात (तराळ-अंतराळ), स्वा. वि. दा. सावरकर (माझी जन्मठेप), प्रबोधनकार ठाकरे (माझी जीवनगाथा), माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम (अग्निपंख), यांच्यासारख्या ध्येयवेड्या माणसांची आत्मचरित्रं आपल्याला जगण्याची लढाई जिंकण्याची प्रेरणा देतात. कठीण प्रसंगांना धीरोदात्तपणे तोंड देऊन जीवनात यशस्वी होण्याचं बळ देतात.

विवेक, कर्तृत्व, त्याग, व्यवहारचातुर्य, बुद्धिमत्ता, दूरदृष्टी, उदात्त ध्येयवाद, तेजस्वी आणि अभिमानी वृत्ती वाचनाद्वारे मिळत असल्याने माणसाची मन:शांती बिघडत नाही. किंबहुना भांडण - रागाने मन:शांती बिघडल्यास विनोदसम्राट पु. ल. देशपांडे यांचे 'बटाट्याची चाळ' सारखे पुस्तक वा आचार्य अत्रे यांच्या 'झेंडूची फुले'मधील विडंबन कविता हसवता हसवताही मन:शांती घडवितात.

वाचनाने मिळणारी मन:शांती चिरकाल टिकणारी असल्याने वाचन निवडपूर्वक करावे. काय आणि कसे वाचावे, याचाही विचार करणे महत्त्वाचे आहे. मनोरंजनाबरोबरच ज्ञानात भर घालणारे वाचन माणसाला वैचारिक आस्वादक बनवते. म्हणूनच वाचनाने मन:शांती लाभल्यास शरीराची कार्यप्रवणताही वाढते. मन आणि शरीर सुदृढ झाले तर व्यक्ती सुदृढ बनते. समानता, सहकार्य, त्याग, परस्पराभिमान, वात्सल्य ही मूल्यं वाचनरूपी छंदानेच अंगी बळावतात. आजची पिढी आणि उद्याची पिढी यातील अंतर कमी होऊन आपण, आपला देश, आपली महान संस्कृती आणि 'खरा तो एकचि धर्म' असलेला मानव धर्म सुरक्षित ठेवण्यासाठी वाचन करायलाच हवे. कारण...

*ज्याला लागला वाचनाचा लळा*
*त्याच्या जीवनाचा फुलला मळा!*

✽✽

पंधरा

# स्पर्श

वातावरणात असह्य उन्हाळा, त्यात दुर्धर आजार अशी विदारक परिस्थिती असताना हळूवार येणारा वाऱ्याचा थंडगार स्पर्श, सोबत असलेल्या व्यक्तीचा उबदार आणि आश्वासक स्पर्श मनाला उभारी देऊन जातो. क्षणभर का होईना थंडावा निर्माण करतो, आजार पळवतो, अशी ताकद 'स्पर्श' नावाच्या दोन अक्षरी शब्दात आहे. 'स्पर्श' असा उच्चार केला तरी मनाला खूप खूप बरे वाटते.

मानवी जीवनातील माधुर्य, औदार्य आणि सहकार्य या विविधरंगी गुणांचा स्पर्श नजाकत खुलवत असतो. हस्तांदोलन, हृदयभेट यातून तर स्पर्श अधिकच जवळीक साधत असतो. माणुसकीचा ओलावा जपणारा स्पर्श प्रत्येक प्राणिमात्राला आवश्यक असतो. वातावरणात निर्माण होणारी हळूवार, नाजूक वाऱ्याची झुळूक मानवी मनात आनंदाचे लक्ष लक्ष कारंजे फुलवते. पर्जन्यकाळात तर सातत्याने वाट पाहायला लावणाऱ्या पर्जन्यराजाच्या स्पर्शासाठी मातीही आतुरते, मोहरते. माती (मातृभूमी) आणि माता या दोन्ही गोष्टी स्वर्गापेक्षाही आपल्याला प्रिय आहेत. म्हणूनच मातेच्या मायेचा स्पर्श आपल्याला दु:ख-यातनांपासून दूर ठेवतो; तर पारतंत्र्यात असलेल्या मातृभूमीच्या उद्धारासाठी प्रसंगी अनेकजण हसत हसत फासावरही जातात. फासावर जाताना आपल्या प्रिय मातेला स्पर्श करून नतमस्तक होऊन स्वत:चे जीवन संपवतात. लहान बाळ म्हणून जन्माला येणारा प्रत्येक जीव आपल्या आईच्या ऊबदार स्पर्शानेच घडत असतो. आईच्या कुशीचा स्पर्श जगातील इतर कोणत्याही स्पर्शापेक्षा श्रेष्ठ असतो. त्याचा आनंद अवर्णनीय आहे.

*'तुझा स्पर्श होता ऋतू मोहरावे*
*तुला पाहता दु:ख माझे हरावे...'*

अशी स्पर्शाची महती गाताना गौरवकुमार आठवले गझलेतून मखमली स्पर्शाची किमया सांगतात. तर लहान बाळाचे मऊ मऊ हातपाय व इतर अवयवांचा स्पर्श, आईच्या मायेचा स्पर्श, परदेशातून आल्यावर मातृभूमीला आणि मातेला वंदन करून लोटांगण घालण्याचा स्पर्श, शतक झाल्यानंतर किंवा एखादा उत्तम सामना जिंकल्यानंतर मातीला वंदन करण्याचा स्पर्श, माता-पित्याच्या निधनानंतर सांभाळणाऱ्या मित्रांचा स्पर्श असे अनेक स्पर्श आपण आयुष्यभर विसरूच शकत नाही. मातृत्वाची सृजनता घडविणारा स्पर्श तर आयुष्यभराचा



ठेवा असतो. थंडगार वाऱ्याची झुळूक आल्यावर मनाचा वाढलेला उत्साह प्रत्येकाला हवाहवासा वाटणारा मनोहारी स्पर्श आहे.

प्रत्येक स्पर्शाला वेगवेगळी परिभाषा आहे. एखादा नवोदित कलाकार कला सादर झाल्यानंतर वाहवा मिळवितो. त्याला पाठीवरची मिळालेली शाबासकीची थाप, तो स्पर्श त्याला भविष्यातील उत्तम कलावंत घडविण्याचा साक्षीदार असतो. एखाद्या मोठ्या कलावंताचा स्पर्श तो दीपस्तंभासमान मार्गदर्शक मानून सतत मनात जपत राहतो. छत्रपती शिवरायांचे वर्णन करताना...

*'स्पर्श तुझ्या पायांचा हो अन्*
*पेटून उठली माती;*
*पायतळीचे दगडही उठले*
*मिळवित प्राणज्योती...'*

असं म्हणणाऱ्या कवयित्री पद्मा गोळे यांनी निर्जीव गोष्टींनाही सजीवपणा देण्याची ताकद केवळ स्पर्शात असल्याचे सांगितले आहे. 'परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होते' याचा अर्थही चांगल्या माणसांच्या संगतीत सर्वसामान्यांना जगण्याची उभारी येते, असाच आहे.

स्पर्शाची मोहिनी आणि स्पर्शाचे महत्त्व लक्षात घेता स्पर्शाशिवाय आयुष्याचा मनोहारी रथ ओढणे केवळ अशक्यच नाही; तर दुरापास्तही आहे. म्हणूनच नकळत झालेला स्पर्शही आयुष्यभर लक्षात राहतो आणि या धावपळीच्या युगातही माणूस त्या स्पर्शाचा आनंद उपभोगतो. रसिकवाचकांचा वाचनस्पर्श लेखनाला नवीन लेखनाची उभारी देतो. बघा रसिकहो! आहे की नाही स्पर्शाची जादू अनोखी!!

✾✾

सोळा

## पाऊस तुझ्या सयीचा...

*पाऊस तुझ्या सयीचा*
*मम हृदयी झंकारतो*
*तुझ्या माझ्या मनातली*
*गाणी ओठी आळवितो...*

असं पाऊसगाणं हृदयातून बाहेर पडलं की तिची आठवण अनावर होते. प्रत्येक पावसाळ्यात तिची सय मनात जागी होते. विशेषत: पहिला पाऊस पडला की मनातही तिच्या आठवांचे ढग जमा होऊ लागतात. हृदयातल्या ठोक्यांचा वेग वाढतो. तिच्या सहवासातल्या किंबहुना तिच्यासोबत पावसात भिजलेल्या गच्च आठवणींचा मनमोर प्रत्येक पावसात थुईथुई पिसारा फुलवून नाचू लागतो.

तिची नि माझी पहिली भेट, जी मी सदैव हृदयाच्या कुपीत जपून ठेवली आहे. मुसळधार पावसातल्या त्या आठवणीतल्या दिवशी कॉलेजातलं शेवटचं लेक्चर संपलं नि मी सायकलवर टांग मारली. थोडा पुढे जाताच पावसाने मला रस्त्यातच गाठलं. मोरपंखी तारुण्याचे दिवस असल्याने पाऊसधारा झेलत झेलतच सायकल घराच्या दिशेने पिटाळू लागलो. तीही रस्त्याच्या कडेने भिजतच चालली होती. बहुधा छत्री घरी विसरली असावी. अचानक का कोण जाणे, तिने मागे वळून पाहिले. मी जवळ येताच ती थांबली. मीही सायकलवरून खाली उतरलो. ओळखपाळख नसल्याने, त्या संततधार पावसातही एकमेकांकडं पहातच राहिलो. तीही बोलेना आणि मीही. 'प्लीज लिफ्ट देता का?' असे म्हणताच मी चक्क उडालोच. आयुष्यात पहिल्यांदाच कुणा सुंदर तरुणीनं लिफ्ट मागितली अन् तीही सायकलवर! त्यावर मी बापडा काय म्हणणार. असा विचारात गढलेला पाहून तीच 'इट्स ओके!' म्हणून चालायला लागली. तेव्हा मी भानावर येऊन म्हणालो, 'हो का नाही. चला, बसा ना मागे' काहीच न बोलता तिला सांगितल्या ठिकाणी सोडून दिले. 'थँक्स' म्हणून गोड स्मित करत ती निघून गेली. ती दिसेनाशी होईपर्यंत मी तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहातच राहिलो...

नंतर कित्येक दिवस ती मला दिसली नाही. कॉलेजातही नाही आणि तिच्या गल्लीकडील रस्त्यावरही. पहिल्याच भेटीत तिनं मला आपलंसं केल्याने मी आतुरतेने तिच्या भेटीची वाट पहायचो. तिच्या गल्लीकडे सारखा सारखा चकरा मारायचो. तिच्यासारखी पाठमोरी



दिसणारी मुलगी पाहिली की मला हायसे वाटायचे. मात्र समोरून पाहिल्यावर फसगत व्हायची. त्यामुळे जिवाची घालमेल व्हायची. पण मला ती काही दिसली नाही, ती नाहीच.

पावसाळा संपत आला आणि तिची भेट नाही. मी तिला भेटण्याची आशा सोडून दिली. पण मनात एकसारखी तिची ती भेट स्मरायची. तो दिवस आठवला, की तिच्या आठवांचा पाऊस मनात हमखास पडायचा. तिचं हसणं-बोलणं, तिची पाठमोरी आकृती सारखी मला छळत रहायची.

सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यातले दोन-तीन दिवस राहिलेले. पाऊसही संपण्याच्या मार्गावर. मात्र त्याचं शेवटचं येणं झालं. पुन्हा मुसळधार... पुन्हा घरी जाताना भिजणं आलंच! आणि नेमकी ती दिसली. तशीच ओलेती, पुन्हा मागे वळून पाहणारी. क्षणभर डोळ्यावर विश्वास बसेना. जणुकाही माझीच वाट बघत होती की काय, असं वाटलं. तिच्याजवळ गेलो नि हळूच 'हाय' म्हणालो. तिचं उत्तर 'हाय' आलं. 'सायकलवर बसा' म्हणताच न संकोचता बसली. चालताना पूर्वीच्या ओळखीनं गप्पा सुरू झाल्या. 'इतके दिवस दिसला नाहीत. गावी गेला होता की काय?' असं विचारताच म्हणाली, 'गावीबिवी नाही, टायफाईडनं आजारी होते.' जणुकाही त्या पहिल्या पावसाने शेवटच्या पावसाला निरोप देऊन आमच्या मैत्रीचे रेशीमबंध गुंफले असावे. आमची ओळख त्यानं मैत्रीच्या मनोहारी धाग्यानं घट्ट गुंफली असावी.

तिच्या सहवासात कॉलेजचे सोनेरी दिवस कसे निघून गेले, समजलेसुद्धा नाही. कॉलेजात असताना प्रत्येक पाऊस आम्ही झेलायचो. विशेषत: मीच. कारण आजारी पडण्याच्या नि माझ्यापासून दूर होण्याच्या भीतीनं ती नकार द्यायची. 'नेहमी नेहमी नाही होत टायफाईड' असे म्हटल्यावर मग ती बिनधास्त भिजायची. नंतर कॅन्टीनमध्ये गरमागरम भजे खाण्यात किती आनंद व्हायचा म्हणून सांगू?

आज पुन्हा पाऊस पडतोय. पण आतला पाऊस कोरडाच आहे. ती नाही. तो संततधार पाऊसही नाही. मात्र तिच्या आठवांचा पाऊस मनात नि डोळ्यातही साठलाय. तिच्या आठवणी मनात पिंगा घालू लागल्यात. दूर कुठेतरी असेल ती. माझ्यासारख्या तिच्याही आठवणी जाग्या झाल्या असतील का...

*पाऊस तुझ्या सयीचा*
*जोरात पडुनी जातो*
*अन् आपुल्या हृदयीचा*
*ठोका चुकवुनी जातो....*

✽✽

सतरा

# घर दोघांचे... घरकुल पाखरांचे

आमच्या लग्नाचा वाढदिवस आम्ही सर्व कुटुंबियांनी साजरा केला. मस्तपैकी धमाल केली. चिमण्या पाखरांसोबत फिरलो. खूप आनंद झाला. लग्न झाल्यापासून गत वर्षांत घडून गेलेल्या एक एक घटना आठवल्या नि मन सुखदु:खाच्या अनेक घटनांनी व्याकूळ झालं. लग्नापूर्वीची हुरहूर आणि लग्नानंतर काही वर्षांचा झालेला संसार या दोन्ही बाबींमधील अनेक प्रसंग डोळ्यासमोर येऊन गेले. एका दिवसात इतका आनंद भरभरून मिळाला. खरंच 'लग्नाचा वाढदिवस' साजरा करण्याची संकल्पना ज्या कोणी प्रथम सुरू केली असेल, तो मोठ्या निर्मळ मनाचा आणि रसिकोत्तम असेल. नि त्याबद्दल त्या अज्ञात व्यक्तीचे ऋण प्रत्येक संसारी माणसाने मान्य केलेच पाहिजे.

संसारात रोज रोज येणाऱ्या अडचणींवर, रुसव्या-फुगव्यांवर मात करून आनंदी - सुखी जीवनाचा राजमार्ग बनविण्यास लग्नाचा वाढदिवस मदत करीत असतो. जन्माला येण्याच्या अत्युच्च आनंदाचा, मातृत्वाचा ठेवा, त्याचा आनंद जसा अवर्णनीय असतो; तसाच विवाहानंतर आपल्या आयुष्यात येणारी नवी व्यक्ती आणि नंतर जन्माला येणारी चिमणी पाखरं या सर्वांविषयी निर्माण होणारे प्रेम, आपुलकी, जिव्हाळा, वात्सल्य खरोखरच शब्दातीत असते. आयुष्यात जन्म आणि मृत्यू या दोघांमध्ये विवाहासारखं पवित्र बंधन मानणारी नात्यांची शृंखला आयुष्य आनंदाने कसं जगावं! याचा आदर्श वस्तुपाठ असते. विवाहानंतर माहेरावरून पतीच्या घरी आलेली मुलगी, आपल्या पतीच्या घरालाच सर्वस्व अर्पण करीत असते. त्याच्या सुखदु:खाशी समरस होत असते. संसारात वेळोवेळी अनेक अडचणी, दु:खद प्रसंगांना तोंड द्यावं लागतं. पती-पत्नीत होणाऱ्या कुरबुरीचं रूपांतर कधी कधी विकोपास जाऊन मोठं भांडणही होतं. मात्र अशावेळी कोणीतरी एकाने शांत राहिलं, माघार घेतली, चूक समजून माफ केलं तर ही भांडणं क्षणात मिटतात. शेवटी तडजोडीच्या नि एकमेकांवरील विश्वासाच्या भावनेवरच संसाररूपी नात्याचा डोलारा सांभाळावा लागतो. लग्नाचा वाढदिवस ही भावना यावर अतिशय रामबाण उपाय ठरते. किंबहुना एकमेकांबद्दलचे प्रेम, जिव्हाळा, सहानुभूती, दयाळूपणा, आयुष्यभर एकत्र राहण्याच्या घेतल्या गेलेल्या आणाभाका, विवाहप्रसंगी होणारे सप्तपदीसारखे विधी या सर्व गोष्टींमुळेच पती-पत्नीचं नातं घट्ट झालेलं असतं. चूक तुझी की माझी? यापासून सुरू झालेली अशी भांडणं संसार



तोडण्यापर्यंत जातात नि जन्मभर जोडीदार असण्याचं स्वप्न धुळीस मिळण्याची चिन्हं दिसू लागतात. तेव्हा लग्नाचा वाढदिवस सोनेरी मध्यस्थी करून हे नातं टिकवतो. म्हणूनच आयुष्यभराचा आनंद वाढविण्यासाठी लग्नाचा वाढदिवस हा मैलाचा दगड ठरू शकतो. संसार हा काही बाहुलाबाहुलीचा किंवा भातुकलीचा खेळ नाही. कारण भातुकलीचा खेळ क्षणिक असतो. जीवनभरचा जोडीदार निवडताना अवास्तव स्वप्नं पहाणंही धोकादायक असते. आपल्याला समजून घेणारा. सुखदु:खात धीर देणारा, आजारपणात सेवाशुश्रुषा करणारा जोडीदार महत्त्वाचा असतो किंवा योग्य निर्णय घेतेवेळी होणाऱ्या परीक्षेत उत्तीर्ण होणारा परीक्षार्थीच जीवनाच्या परीक्षेत उत्तीर्णच नव्हे, तर नेहमीच यशस्वी होतो. अशावेळीही लग्नाचा वाढदिवस चांगल्या-वाईटाची, खऱ्या-खोट्याची जाणीव करून देत असतो आणि नाती दृढ करत असतो. आजच्या धावपळीच्या युगात प्रत्येकाला आपला जोडीदार राजकुमार, राजकुमारी, मिस - मिस्टर वर्ल्ड, राजबिंडा - अप्सरा अशा प्रकारचा असावा, असे वाटते. मात्र असे करताना कोणीही स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाकडे लक्ष देत नाही. दुसऱ्याबद्दल अवास्तव अपेक्षा करतो. 'गोराही म्हणतो गोरी पाहिजे, अन् काळाही म्हणतो गोरी, आता तुम्हीच सांगा पाव्हणं, कुठं जातील काळ्या पोरी?' या प्रचलित गाण्यानुसार प्रत्येकजण वागत असतो. मात्र आहे त्या परिस्थितीत समाधान मानणारी जोडपीच यशस्वीपणे संसार करू शकतात. त्यांच्या आयुष्याचा लग्नाचा वाढदिवस वर्षाने नव्हे, तर रोजच्या रोज येऊन आनंदाची कारंजी थुईथुई उडवीत असतो. जीवनात सर्वात यशस्वी पुरुष किंवा स्त्री कोणती? या प्रश्नाचं योग्य उत्तर द्यायचं झालं तर जो पुरुष 'संसार' नावाची तारेवरची कसरत आयुष्यभर अतिशय यशस्वीपणे करतो. बायकोचे चोचले पुरविण्याबरोबरच आपल्या आई-वडिलांचीही इमाने इतबारे सेवा करून एक यशस्वी पती आणि एक यशस्वी पुत्र म्हणून नाव कमवतो, तो यशस्वी पुरुष आणि नवऱ्याच्या सुखात आपले सुख मानून, नवऱ्याच्या सवयी, तसेच त्याच्या रागलोभांना जी हसत खेळत सांभाळते, नि सासर - माहेर यांना सांधणारा पूल बनविणारी सुस्वभावी, सुजाण, सदैव हसतमुख असते, जिचा उत्तम पत्नी आणि सेवाभावी सून म्हणून चारचौघांमध्ये गौरव होतो, तीच खरी यशस्वी स्त्री. अशा यशस्वीपणाचा गौरव करण्याचा दिवस म्हणजे लग्नाचा मनोहारी वाढदिवस. लग्नाच्या वाढदिवशी होणारा आनंद चिरकाल टिकायला हवा. कारण सुखाचा आनंद उपभोगायला जसे आपण वाटेकरी होतो, तसेच दु:खातही एकमेकांना सावरलं तरच खऱ्या अर्थाने एकमेकांचं जीवन सार्थकी लागतं. आणि सात जन्मीच नव्हे, तर प्रत्येक जन्मी हाच पती किंवा हीच पत्नी मिळो, ही मागणी नकळत पूर्ण होत असते.

✾✾

अठरा

# आत्मविश्वासाची गुरुकिल्ली

आत्मविश्वास मानवाच्या आयुष्याला आकार देणारा शब्द. जीवन जगत असताना, सुखी आणि संपन्न जीवनाची स्वप्नं पुरी करण्यात आत्मविश्वासरूपी मित्राचा फार मोठा हात असतो. इतर कोणत्याही मित्रापेक्षा आत्मविश्वास ह्या आंतरिक आणि जिवलग मित्राचा योग्य वेळी, योग्य सल्ला मानला तर आयुष्याला आकार मिळतो. कारण आत्मविश्वासाने मनानं उभारी घेतल्यास कोणत्याही अचानक उद्‌भवलेल्या संकटावर प्रयत्नपूर्वक मात करता येते.

'प्रथम योजना, नंतर विक्रम' या उक्तीनुसार आत्मविश्वासानं कोणतीही योजना आखून, जर जाणीवपूर्वक प्रयत्न केले, तर अतिशय उच्च प्रतीचं यश दृष्टिक्षेपात येऊन नक्कीच मिळतं. विशेषत: आत्मविश्वासानं आपलं व्यक्तिमत्त्व खऱ्या अर्थानं सुधारतं आणि समाजात मिळून-मिसळून राहण्याचं कर्तव्यही पार पाडण्याची जाणीव आत्मविश्वास मिळवून देत रहातो. आपल्या अंगी जर आत्मविश्वास असेल, तर सातत्यानं आपण नाविन्याचा शोध घेण्याची आवड जोपासून, नवनवीन कल्पना प्रत्यक्षात उतरवू शकतो. त्यामुळं आयुष्यात उज्ज्वल यश आपल्या पायी लोळण घेऊ शकतं. म्हणून यशाच्या अत्युच्च शिखरावर विजयाचा कायमस्वरूपी झेंडा रोवण्यासाठी 'आत्मविश्वासाची गुरुकिल्ली' प्रत्येकाला आवश्यक आहे. आत्मविश्वासाने आणखी एक गोष्ट साध्य होते, ती म्हणजे माणूस कोणत्याही कामाला नकार देत नाही. शिवाय निराश न होता कोणतंही काम प्रामाणिकपणे करण्याची जाणीव आत्मविश्वासानं मिळते. आपलं कर्तृत्व आणि आपण कर्तव्य पार पाडत असताना आत्मविश्वास थोरामोठ्यांचा आशीर्वाद भावी आयुष्य ताणतणावरहित आणि समस्यारहित करत असतो.

शिवाय, आत्मविश्वासामुळं आपली मानसिक, शारीरिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक अशी सर्वांगीण प्रगती होण्यास निश्चितच मदत होते. त्याचबरोबर रोजच्या व्यवहारात मिळालेलं कोणतंही छोटं वा मोठं यश आपल्याला हुरळवत नाही किंवा मिळालेलं अपयश पचविण्याची ताकद केवळ आत्मविश्वासरूपी मित्रामुळेच येते.

आयुष्यातला प्रत्येक क्षण आनंदी, हसत - खेळत ठेवण्यासाठी 'आत्मविश्वासाचं कोंदण' अतिशय जरुरीचं असतं. मानवी मनाचं प्रतिबिंब अस्सल आणि निर्मळ करण्याचं



कामही आत्मविश्वासानं शक्य होतं. रोजची सकाळ आत्मविश्वासरूपी चैतन्यानं बहरलेली असल्यास, रोजची संध्याकाळ आणि रात्र सुखासमाधानाची जाण्यास कष्ट पडणार नाहीत.

आत्मविश्वास स्वावलंबन शिकवतो. आत्मविश्वास सुखासारखं दु:खही खेळीमेळीच्या वातावरणात स्वीकारण्याची उभारी देतो. दुर्धर आजारी पडलेल्या माणसाला जगण्याची प्रबळ इच्छाशक्ती आणि जिद्द देतो, तो केवळ आत्मविश्वास. अनाथ किंवा वृद्ध व्यक्तीला आधाररूपी सोबत आयुष्यभर लाभते, ती फक्त आत्मविश्वासाची! अंध किंवा इतर शारीरिक व्यंग असलेली माणसं केवळ आत्मविश्वासाने आपलं जीवन न अडखळता उत्तम प्रकारे जगू शकतात.

चैतन्य आणि उत्साहाचा अविरत झरा असणारा तरुण आपल्या तारुण्यात जर आत्मविश्वासानं कोणतेही काम इमाने इतबारे करून जीवन जगू लागला, तरच त्याच्या भावी आयुष्याला सुखाची झालर लाभते. तारुण्यातील बेकारीचं नैराश्य, भावी आयुष्याबद्दलची शंकाकुशंका क्षणात पळवून लावण्याचं सामर्थ्य केवळ आत्मविश्वासातच आहे. म्हणूनच 'आत्मविश्वास' हा जिवलग मित्र आपण प्रत्येकानेच जिवापाड जपायला हवा.

✾✾

एकोणावीस

# दीपावली : आनंदाचा झरोका

*आली नाचत बागडत*
*आली सुगंध उधळीत*
*अंधाराचा करण्या नाश*
*आली ज्ञानदीप तेवत!*

अशा दीपावलीच्या आनंदमयी आणि मोहमयी शब्दफुलांच्या पायघड्या अंथरून मी तुझी किती आतुरतेने वाट पाहतोय... निदान यंदाच्या दीपावलीच्या आनंदात तुझं मनमोकळं हसणं मिसळून आनंदाचा बहार तरी उडवून दे! माझ्या प्रीतीची फुसक्या फटाक्यासारखी हवा काढून घेऊ नको. तुझ्या नि माझ्या पवित्र आणि हळव्या प्रेमकहाणीची साक्षीदार फक्त दीपावलीच आहे. दीपावलीत नवनवीन कपडे, फटाके, गोडधोड फराळाची मनमुराद लयलूट करण्याचं ठरवलं होतं ना! मग कुठे गं माशी शिंकली? दीपावलीच्या लक्ष्मीसारखी तू पवित्र, निरागस, निर्मळ, माझ्या मनाला शब्दसौख्याची श्रीमंती देणारी आणि गोऱ्या रूपड्यानं खऱ्या अर्थानं अंध:काराचा समूळ नाश करणारी!

गेल्या दिवाळीला तुझ्या पाठीमागे फटाका वाजवला म्हणून इतकी रागावलीस. तुझ्याविना सण साजरा करणं म्हणजे मिठाशिवाय बेचव जेवण आहे. अशा बेचव जगण्यापेक्षा तू लवकर ये. तुझी मी आतुरतेने वाट पाहतोय. अगं, फटाके फोडण्यासाठीच असतात. आयुष्यरूपी दीपावलीत विविध प्रकारच्या कर्णकर्कश्श फटाक्यांचे आवाज ऐकावेच लागतात ना? मग इतकं का कोणी नाराज होतं?

आनंद नि उत्साहाचं सुवासिक उटणं घेऊन आलेली दीपावली तू नजरेत साठवून घे. काही दिवसांसाठीच नव्हे; तर आयुष्याभराचा आनंद मिळवून घे. गोडतिखट फराळाची चव चाखून घे. निदान यावेळी तरी नाराज होऊ नकोस ना. बघ, धरती कशी छान सडा - रांगोळ्यांनी नखशिखांत सजली आहे. दारोदारी आकाशकंदिलांचा झगमगाट डोळे दिपवतो आहे. सारेजण नवनवीन कपडे, फटाके नि फराळांचा आनंद लुटत आहेत. 'आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहीकडे' अशा शब्दात सर्वत्र आनंद ओसंडून वाहत आहे. मात्र तू नाहीस, हे सत्य कसे नाकारू? तुझ्या सहवासातील आनंदी आठवांचा झरोका दीपावली सारखा सारखा उलगडून दाखवत आहे.



तुझ्यासारख्या प्रियेची आठवण, अनावर ओढ ताजी करणारी, आतुरतेने जी माणसं एकमेकांच्या भेटीसाठी आसुसलेली आहेत, त्यांची भेट घडवून आणणारी, पतीपत्नी, आईवडील, भाऊबहीण आणि मित्रत्वाचं नातं अखंड दृढ करणारी दीपावली आनंदाचा अखंड ठेवा देते आहे. आयुष्याचा सारा गोडवा चार दिवसात मिळतो. मीही तुझ्या सौख्याची प्रार्थना तिच्याकडे करतोय. चैतन्य, औत्सुक्य आणि नावीन्याची तुझी आवड मनस्वीपणे जोपासणारी दीपावली... मनातील भावनांचा जल्लोष करणारी, मनामनाला मोहिनी घालणारी, तुझ्या सहवासातील साऱ्या गोड आठवांना ताजा टवटवीतपणा देणारी, अनेक मनोहारी रंगांची उधळण करणारी, सणांची राणी दीपावली माझ्या राणीइतकीच मनात सदैव टिकून राहणार आहे.

म्हणून उशीर करू नकोस. लवकर ये. मी तुझी आतुरतेने वाट पाहतोय...

*दीपावलीमुळेच होईल*
*सुखा-समाधानाची उधळण,*
*देईल तीच केवळ*
*आपणा आनंददायी जीवन.*

✾✾

वीस

# चिंब सलाम...

पाऊस... अखंड विश्वातील चराचराला मोहून टाकणारा, विश्वातील सारी सृजनशीलता ज्याच्यामुळे निर्माण होते तो पाऊस! सर्वांचा जिवाभावाचा सखा असणारा हा पाऊसराजा साऱ्या प्राणिमात्रांवर अधिराज्य गाजवत असतो. मनामनावर मोहिनी घालून, सर्वांची मनं प्रफुल्लित करणारं रामबाण औषध म्हणजे पाऊस. पावसाळ्यातील सर्वदूर असलेला हिरवेपणा फक्त डोळ्यांनाच नव्हे; तर मनालाही तजेलदार प्रसन्नता देतो.

आयुष्यातील आनंदाचा प्रसंग जसा आपण कायम स्मरणात ठेवण्याचा प्रयत्न करतो, तसाच पावसाळ्यातील आनंददायी प्रसंग एकच नव्हे; तर अनेक प्रसंगांची शृंखलाच प्रत्येक पावसाळ्यात आपल्या मन:चक्षूंसमोर उभी राहते.

पाऊस पडून गेला की मग सुरू होते पाण्यात होड्या सोडण्याची घाई. सर्वात जास्त वेळ आपलीच होडी फिरली पाहिजे, वाहून जाऊ नये यासाठी लहानपणी आपण किती काळजी घेत असतो. तेव्हा आनंदाची कारंजी पावसाबरोबरच मनातही थुईथुई उडू लागतात.

पाऊस दरवर्षी येतो नि जातो. पण प्रत्येकवेळी हवाहवासा वाटणारा पाहुणा आल्यावर जसा आनंद होतो; तसा आनंद अनुभवण्यासाठी आपण त्याची वाट पाहत राहतो. उन्हाची काहिली दूर करून थंडावा पेरणारा पाऊस, प्राणिमात्रांबरोबरच काळ्या आईचीही तहान भागविणारा पाऊस, आयुष्यातील अनेकविध प्रसंगांची आठवण करून देणारा पाऊस, आयुष्य किती आनंदाने-समाधानाने जगावे, याची जाणीव करून देणारा पाऊस, अशी कितीतरी रूपं मी मनात साठवून ठेवली आहेत त्या मनामनाला चिंब करणाऱ्या मनोहारी पावसाची.

दरवर्षी पावसाळ्याची सुरुवात झाली की मनाला जो तजेला येतो, उत्साह आणि आनंदाचा उत्स्फूर्त आविष्कार दिसतो; तो कोणत्याही महागड्या औषधांच्या वापराने येणार नाही. कारण पाऊस हे एकच उत्साही रामबाण औषध आहे. हवेतला गारवा, मातीचा सुगंध, पाऊस सरीत मनमोकळं भिजण्याची मजा याचा आनंद काही औरच असतो. आयुष्यातला सारा आनंद, सारी सुखं जणुकाही आपल्या पायाशी लोळण घेत आहेत की काय, असं वाटतं. सृजनशीलतेला बहर आणणारा हा पाऊस तसा फारच बेरकी आहे. पावसाळी वातावरण निर्माण व्हावं. छत्री, रेनकोट, पावसाळी बूट घालून निघावं तेव्हा नेमका



तो येत नाही. वाट पहायला लावतो. मात्र बरोबर हे सारं नसतं तेव्हा तो येतो की बस्स! इतका का रागावल्याची भाषा बोलतो. आला तर का आला? नि आला नाही तर का आला नाही? त्याचंही असंच आहे, तोही मनावर घेत नाही. सजीव सृष्टीला नखशिखांत भिजवतो.

श्रावणातल्या पावसाचं तर काय वर्णन करावं? नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी, पोळा अशी एकामागून एक सणांची शृंखला, गोडधोड खाण्याची मेजवानी घेऊन येणारा श्रावण केवळ पर्जन्यराजाच्या कृपेमुळेच धोऽधोऽ बरसतो. 'श्रावणात घन निळा बरसला...' पासून 'श्रावणमासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहिकडे,क्षणात येते सरसर शिरवे, क्षणात फिरूनी ऊन पडे' ही बालकवींची कविता श्रावणातला ऊन - सावलीचा खेळ अचूकपणे शब्दबद्ध करते. म्हणून आषाढ-श्रावणातला पावसाचा जोर खऱ्या अर्थाने आयुष्यातला आनंदाचा शिडकावा करत असतो. अखिल विश्वाच्या कल्याणाचा वसा जणूकाही पावसानेच घेतला आहे की काय, असा प्रश्न आपल्याला पडतो. अशावेळी आपण पावसाला देवदूतच मानायला हवं. तो यावा म्हणून त्याची अविरत वाट पाहत असतो. पाऊस आपला जिवाभावाचा सखा आहे. आपल्या सुखदु:खाशी तो समरस होतो. दु:खाचा खडतर काळ दूर करून सुखाची हिरवळ निर्माण करणारा पाऊस म्हणूनच प्रत्येकाला आवडतो. सर्दीची पर्वा न करता, वादळवाऱ्याची तमा न बाळगता पावसात चिंब चिंब भिजण्याचं सुख मनापासून घेण्याची मजा काही औरच आहे. मनामनाला प्रसन्न करणाऱ्या अशा या पावसाला चिंब चिंब सलाम!

✾✾

एकवीस

# तू भेटतेस तेव्हा...

*तू गेल्यावर...*
*असे हरवले सूर...*
*हरवले गाणे...!*

हे गाणे ऐकताना मनात जुन्या आठवणींनी गर्दी केली. समजत्या वयापासून आजपर्यंतच्या आयुष्यातील घटनांनी, विशेषत: विरहाच्या क्षणांनी मनात गोंधळ निर्माण झाला. माणसाला विरह नेहमी या ना त्या कारणाने सहन करावा लागला तरी त्याचे मन विरहाला सरावत नाही. आयुष्यात येणाऱ्या अनेक विरहाच्या प्रसंगांनी माणूस हळवा होऊन जातो. कधी कधी तर रडवेला होऊन जातो, मात्र विरहाचा प्रसंग संपला की, आनंदाचा झरा झुळूझुळू वाहतो. मनातला उत्साह ओसंडून वाहतो.

आठवण आणि विरह या एकाच नाण्याच्या दोन बाजू. विरह सोसताना आठवणींचे अनेक पक्षी काळजात घिरट्या घालू लागतात. मात्र एकेक क्षण तासासारखा, दिवसासारखा भासू लागतो. एकमेकांच्या सोबतीत एकत्रपणे घालविलेल्या अनेक आठवणी एकामागून एक आठवू लागतात.

आपल्या मनावर अधिराज्य गाजविणारी प्रिया आज येणार, असे समजल्यावर आपण तिची कितीतरी आतुरतेने वाट पाहत असतो! तहानभूक विसरून जातो. वेळ झाली तरी ती येत नाही तेव्हा तर पावसाच्या एकेक थेंबाची वाट पाहणाऱ्या चातक पक्ष्याप्रमाणे आपली अवस्था होऊन जाते. आपल्याला दिसणारी प्रत्येक व्यक्ती जणूकाही आपलीच प्रिया आहे, असे वाटत राहते.

मन नैराश्य, दु:ख लपवू शकत नाही. दु:खानंतर सुखाचा थोडासा जरी शिडकावा झाला; तरी मन आनंदी होते. विरहानंतर होणाऱ्या भेटीचा हा आनंद अवर्णनीय असतो. विरहाचं दु:ख सोसणारी व्यक्तीच तो आनंद सांगू शकते. तो आनंद क्षणिक न राहता आयुष्यभर पुरून उरतो.

विरहाचा इतका परिणाम मनावर होतो की, आयुष्यात काहीच मजा वाटत नाही. जीवन अगदी नीरस वाटते. प्रेमी युगुलाला तर विरहात यापूर्वी एकत्र घालवलेले क्षण आठवत राहतात. कवी प्रकाश धुळे यांच्या कवितेतला प्रियकर अशा भावना उत्कट शब्दात मांडतो...



*ही बाग मी काही*
*मुद्दाम लावलेली नाही...*
*तू माझ्यासह जिथं जिथं*
*म्हणून बसायचीस,*
*तिथं तिथं आता*
*तुझ्या आठवणींची फुलं*
*फुलू लागलीयत... एवढंच!*

खूप वाट पाहायला लावल्यानंतर एकमेकांना भेटण्याचा क्षण आला की, मग काय नि किती बोलावे, हे काहीच कळत नाही. अशा विरही प्रियकराची अवस्था कवीश्रेष्ठ सुरेश भटांच्या गझलेनुसार होते. खूप खूप बोलावेसे वाटते, पण शब्द फुटत नाहीत.

*तू भेटलीस तेव्हा मी बोललोच नाही*
*तू भेटतेस तेव्हा माझे असेच होते...*

आणि मग मनात येते की, ती जर भेटली नसती तर खूप बरे झाले असते. निदान तिच्या मधुर आठवणी सांभाळण्याचे बळ मिळाले असते.

*प्रिय, तुझ्या प्रत्येक आठवणीत*
*एक दिलासा असतो*
*तू भेटली नाहीस तरी*
*मला तो पुरेसा असतो!*

तरीही भेटीची ओढ अनावर असते. विरहाच्या क्षणी तर ती अधिक जाणवते. पण विरहानंतरही पुन्हा विरह सोसण्याची वेळ येण्याची शक्यता निर्माण झाली तर अशा भेटीला नि वाट पाहण्याला काहीच अर्थ उरत नाही. तेव्हा प्रसिद्ध साहित्यिक चंद्रकांत महामिने म्हणतात, तसे होते -

*वाट बघणारं कोणी असेल तर घरी परतण्यात गोडी आहे,*
*ओढ परतीची नसेल तर वाट बघणं ही बेडी आहे*

'विरह' या विषयावर कितीही लिहिले तरी ते थोडेच आहे; कारण विरहात आठवणी मनात गर्दी करू लागतात नि कवितेचे शब्दही फुलताना म्हणतात -

*विरह तुझा असा की त्याचे फक्त व्हावे गाणे*
*न स्फुरताही काही आपसुक लिहीत जाणे.*

बावीस

# शुभेच्छा!

शुभेच्छा! हा साडेतीन अक्षरी शब्द उच्चारला की, मनाला किती आनंद होतो म्हणून सांगू! या शब्दामुळं मनाबरोबर शरीरही नाचू लागतं. रोमरोमात आनंदाची कारंजी थुईथुई नाचू लागतात, इतकी काय जादू आहे या शब्दात कोण जाणे! अगदी जन्मापासून सुरू होणारा हा शुभेच्छांचा सिलसिला आपलं आयुष्य आनंदाच्या सुगंधानं प्रफुल्लित करतो. आजाऱ्याला तर शुभेच्छांच्या टॉनिकनं बरं वाटायला लागतं. आपला आजार... आपलं आभाळाएवढं दुःख... तो क्षणात विसरून जातो. इतकी ताकद असते म्हणे शुभेच्छात! दु:खाचा डोंगर क्षणात भुईसपाट करून जगण्यातला उत्साह वाढवतात, या प्रेमळ शुभेच्छा!

तसं पाहिलं तर प्रत्येक माणूस शुभेच्छांचा मनस्वी भुकेला असतो. भुकेल्याला गरज भाकरीची, तहानलेल्याला गरज पाण्याची, तशी प्रत्येक प्राणिमात्राला आयुष्यात उभारी देण्याची गरज म्हणजे शुभेच्छांची! जीवनात केलेल्या प्रत्येक चांगल्या कामाची पावती देणारा शब्द म्हणजे शुभेच्छा! या शुभेच्छा दिल्याशिवाय आनंद पूर्णच होऊ शकत नाही. परीक्षेत उत्तम गुण मिळवणं, व्यवसायात उत्तुंग यश मिळविणं, चाकोरीबाहेरचं नाविण्य असणारं आव्हान स्वीकारून त्यात यशस्वी होणं, अशा एक ना अनेक प्रसंगी शुभेच्छांचा सहवास आवश्यक असतो.

पहिल्या यशानंतर मिळणाऱ्या शुभेच्छा तर पुढील यशाचा मनोहारी मार्ग बनतात. यश हे प्रवासातील झाडासारखं असतं. एकेक झाड जसजसं मागं मागं जातं; तसतसा आपला उत्कर्ष होत राहतो. या जीवनरूपी प्रवासात शुभेच्छांमुळं मिळणारं बळ नवी आव्हानं स्वीकारण्याचा विश्वास देत राहातं. शुभ अशी इच्छा म्हणजे शुभेच्छा!

जीवनाची खडतर वाट वहिवाट बनवतात शुभेच्छा! वाढदिवस आणि शुभेच्छांचं नातं तर अतूट असं आहे. प्रत्येक वाढदिवसाला मिळणाऱ्या शुभेच्छा पुढील वाढदिवसापर्यंत मनाला ताज्या टवटवीत ठेवतात. वाढदिवसाच्या शुभेच्छांच्या जोरावर माणूस आकाशाला गवसणी घालण्याची स्वप्नं पहातो. यशाचं अवकाश पादाक्रांत करताना त्याच्या इच्छांना फुटणारे पंख यशामागून यश मिळवून आभाळभर पसरतात नि मिळणाऱ्या स्वप्नपूर्तीचा आनंद अवर्णनीय होऊन जातो. तो शब्दात पकडता येत नाही. आनंदाच्या क्षणी खूप बोलावंसं वाटतं. मन मोकळं करावंसं वाटतं, पण शब्द फुटत नाहीत. काय बोलावं, हे कळत नाही.



तेव्हा 'शुभेच्छा' हा एकच शब्द सर्वकाही सांगून जातो. इतकी व्यापकता या एका शब्दात असते, म्हणूनच 'शुभेच्छा' हा शब्द जणू आपल्याला मिळालेली देणगीच आहे, असं म्हणा ना!

भारत हा संमिश्र संस्कृतींचा देश आहे. विविध जातीधर्मातील बांधवांना आपण सणासुदीला शुभेच्छा देऊन, त्यांच्या आनंदात सहभागी होतो. यामुळं आपली संस्कृती, तिनं शिकवलेला सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, धर्मनिरपेक्षता, दुसऱ्याच्या आनंदात आनंद मानण्याची वृत्ती आदी अनेक गोष्टी आपण शुभेच्छांच्या देवाणघेवाणीमुळं कळत-नकळत पार पाडीत असतो. आपल्या जवळच्या माणसाला शुभेच्छा देण्यात जो आनंद असतो, त्याच्यापेक्षा जास्त आनंद अनोळखी माणसांना शुभेच्छा देताना होतो. कारण अनोळखीपणाचा बुरखा दूर सारून आपण त्याच्याजवळ जातो, त्याच्याशी ओळखीचा दुवा जोडतो, तो केवळ त्याला दिलेल्या शुभेच्छांमुळेच! गुलाबाचं छोटंसं फूल देणं, पुष्पगुच्छ देणं, दोन ओळींचं पत्र देणं, नुसत्या शब्दांनी व्यक्त होणं... अशा कोणत्याही प्रकारे शुभेच्छा दिल्या तरी त्याचा अर्थ एकच असतो, तो म्हणजे शब्दसुमनांच्या आनंदी, उत्साहीपणासारखं आपलं आयुष्यही प्रसन्न आणि सदासर्वदा टवटवीत राहावं.

'शुभेच्छा' हा शब्द कानाबरोबरच मनालाही तृप्त करीत असल्यानं आपणही मनापासून शुभेच्छा देत राहा आणि दुसऱ्याच्या आनंदात आनंद मानून मनापासून आनंदी व्हा! आनंदरूपी जीवनाला शुभेच्छारूपी टॉनिक द्या, म्हणजे तुमच्या जीवनातला आनंदही उत्तरोत्तर वाढत राहील.

तेवीस

## प्रेम : संस्कृतीचा सारांश

भारतीय संस्कृतीला फार मोठी परंपरा आहे. सर्वदूर असलेली, सर्वसमावेशक असलेली पारंपरिकता जपण्यासाठी आजही अनेक प्रयत्न केले जातात. त्यातल्या त्यात महाविद्यालयांमध्येच नव्हे; तर शाळांमध्येही विविध प्रकारचे वैशिष्ट्यपूर्ण 'डेज' साजरे केले जातात. ट्रॅडिशनल डे, टाय डे, सारी डे, फ्रेंडशिप डे अशा नाना तऱ्हेचे 'डेज' साजरे करताना तरुणाईचा बहर उसळून येतो. आजच्या धावपळीच्या जगात या निमित्ताने धोतर, पातळ, बैलगाडी अशा ग्रामीण पेहरावाबरोबरच फ्रेंडशिप डेला फ्रेंडशिप बॅण्ड बांधून मैत्रीचा जल्लोष साजरा केला जातो.

१४ फेब्रुवारीला साजरा होणारा 'व्हॅलेंटाईन डे' हा तर प्रेमिकांच्या प्रेमाला वाहिलेला दिवस! तसे पाहिले तर खरे प्रेम हे चिरकाल टिकणारे असते, त्यासाठी एखाद्या विशिष्ट दिवशीच प्रेमाचा उत्सव साजरा करणे, जल्लोष करणे किती बरोबर आहे, हा प्रश्नच आहे. साजरे होणारे हे 'डे' साजरे करण्यामागे असणारे भावनिक, सांस्कृतिक वातावरण निर्मळ असायला हवे. कारण 'डेज' साजरे करताना दिले जाणारे अवास्तव महत्त्व, संपत्तीची उधळपट्टी, प्रेमाचे अतिरंजित प्रकटीकरण कुठेतरी थांबायला हवे. तारुण्यातील उत्साह हा विधायक स्वरूपाचा हवा. छेडछाड, आईवडिलांच्या श्रीमंतीचा दाखविला जाणारा बडेजाव आणि होणारा अतिरेक टाळण्याचाही विचार करायला हवा. सळसळत्या उत्साहाचा बहर हा चिरकाल टिकावा, हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवूनच असे 'डेज' साजरे करायला हवेत. देशात असणारे अनेक प्रकारचे भेदाभेद या निमित्ताने दूर होण्यापेक्षा उघड स्वरूपात दिसून येतात. विविध भागातील पेहराव, पद्धतींचे प्रकटीकरण करण्याचा प्रयत्न मात्र कौतुकास्पद असतो.

एखादा प्रियकर आपल्या प्रेयसीला भेटायला जायला आसुसलेला असतो. सगळे काही सोडून वाऱ्याच्या लहरींवर जावेसे वाटते. पण बिचाऱ्याची सायकल पंक्चर झाल्यामुळे तो तिला भेटू शकत नाही. प्रेमाची गोष्ट अशीच आहे. कारण मनाच्या बँकेत धैर्याचे भांडवल असल्याशिवाय प्रेमाचा चेक फाडू नये, असा सबुरीचा सल्ला याबाबत महत्त्वाचा ठरतो.

विविध 'डेज' साजरे करताना 'प्रेम' या अडीच अक्षरी शब्दामागे असणाऱ्या पवित्र आणि नितळ भावना प्रत्येकाने जपायला हव्यात. शिवाय आज किंमतीही आभाळाला



भिडल्या आहेत. दिवसेंदिवस वाढणारी महागाई व 'डेज' साजरे करताना अनेक बाबींवरचा खर्चही परवडेनासा होतो. या 'डेज'च्या वेळी खऱ्या अर्थाने प्रत्येकाने आपल्याबरोबर इतरांचाही विचार करणे आवश्यक आहे. तरुणाईच्या जल्लोषाला विधायक कार्यक्रमाचे वळण या निमित्ताने देणे गरजेचे आहे. भारताची भावी पिढी घडवताना कविवर्य कुसुमाग्रजांच्या 'प्रेमयोग' कवितेतून सांगितलेला संदेश जर प्रत्येकाने मनापासून पाळला तर हे 'डेज' फक्त त्या दिवसापुरते मर्यादित न राहता आयुष्यभर स्मरणात राहतील...

*प्रेम आहे माणसाच्या*
*संस्कृतीचा सारांश,*
*त्याच्या इतिहासाचा निष्कर्ष*
*आणि भविष्यकालातील*
*त्याच्या अभ्युदयाची आशा एकमेव!*

✻✻

चोवीस

# मना घडवी संस्कार...

सुसंस्कारांची शिदोरी घेऊन माणूस अनेक संकटांना हसत-हसत सामोरा जात असतो. म्हणून 'मना घडवी संस्कार' असे म्हटले जाते. संस्कृती आणि सभ्यता या दोन गोष्टींमधला सुवर्णमध्य किंवा दुवा आहे सुसंस्कार!

माणसाने निर्माण केलेल्या आणि नंतरच्या पिढीने संरक्षित आणि संवर्धित केलेल्या ऐतिहासिक बाबींचा समावेश संस्कृतीत होतो, तर टापटीप आणि चैनीसाठी निर्माण केलेल्या भौतिक बाबी म्हणजे सभ्यता! आज आपण संस्कृतीपेक्षा सभ्यतेवर जास्त भर देत आहोत. कारण प्राचीन आणि जगातील उल्लेखनीय ऐतिहासिक स्थळं केवळ उधळपट्टीद्वारे मजा करणारी टाईमपासची ठिकाणं बनली आहेत. सभ्यतेचा बुरखा पांघरून आपण असभ्यतेची पाळमुळं रुजवतोय; म्हणून माणसाला 'सुसंस्कार'च माणुसकी, सहकार्य, राष्ट्रीय साधनसंपत्तीची जपणूक शिकविणार आहेत.

वाढती गुन्हेगारी, भ्रष्टाचार, विषमता, अमानुषपणा, संशय, हिंसाचार, व्यसनं, जातीय दंगली, बॉम्बस्फोट, दहशतवाद यांसारख्या अनैतिक गोष्टी केवळ सुसंस्कारांच्या अभावामुळेच घडत आहेत. आज माणसाचा सख्ख्या भावा-बहिणीवर विश्वास राहिला नाही. आईवडिलांसारखी पवित्र नाती अनीतीमुळे बदनाम होत आहेत. 'लहान मूल म्हणजे मातीचा गोळा, आकार द्यावा तशी मूर्ती घडते!' यासारखे सुविचार केवळ शाळेच्या भिंतीवर नावापुरते दिसत आहेत. ज्यांच्यापासून संस्कार, आदर्श घ्यावेत, तेच आदर्शांची, संस्कारांची पायमल्ली करीत आहेत. भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनून सर्वसामान्यांच्या मानगुटीवर बसला आहे. एवढं सगळं सांगायचं कारण सर्वसामान्य माणसाचं जीवन कुत्र्यामांजरासारखं, फुलं आणि फुलपाखरांसारखं क्षणभंगुर झालं आहे.

राजकारणी, गुन्हेगार सर्वसामान्यांच्या जिवावर आपली पोळी भाजून घेत आहेत. राष्ट्र आणि समाज केवळ मेंढरांचा कळप झाला आहे. सुसंस्कारांअभावी विदारक आणि भयानक दाहक असं वास्तव समोर आऽ वासून उभं आहे. याला उत्तर आणि रामबाण औषध एकच, ते म्हणजे सुसंस्कारांची जपणूक आणि शिकवणूक.

भारताचं स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी आणि सर्वसामान्यांना दोन वेळची हक्काची सुखाची भाकर मिळवून देण्यासाठी, त्यांचा जगण्यावरचा विश्वास दृढ करण्यासाठी आपण



सारे सुसंस्काराची शिदोरी बाळगूया!

*'सोबतीला चंद्र देतो,*
*अंतरीचा ध्यास देतो,*
*तुम्ही जिथे जाल तेथे*
*मी तुम्हा विश्वास देतो!'*

असा अढळ विश्वास आईवडिलांचा मुलांवर, मुलांचा आई-वडिलांवर, भावाबहिणींचा एकमेकांवर, पती-पत्नीचा परस्परांवर, पुढाऱ्यांचा जनतेवर आणि जनतेचा लोकशाहीवर असला पाहिजे. सुसंस्कारांच्या माध्यमातून ज्ञानाची कवाडं सताड उघडी झाली पाहिजेत. जन्मानंतर पालक, शिक्षक, समाजशिक्षक, विवाहानंतर जोडीदार, वृद्धापकाळी नातवंडं हे सुसंस्कारांचे विविध काळातील विकासचक्र, ज्ञान आणि सांस्कृतिक, वैचारिक, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक जाणिवा जागृत करणारे असावेत.

लहानपणीच दुसऱ्यांच्या वस्तू घेऊ नये, चोरी करू नये, मनावर ताबा ठेवावा, चांगल्या सवयी लावाव्यात, वडिलधाऱ्यांचा मान राखावा, झोपेतून उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत साऱ्या चांगल्या बाबी मनापासून कराव्या, दुसऱ्यांचे वाईट चिंतू नये, यासारख्या सवयी लावल्या तर तरुणपणी व नंतरही वाईट विचारांचा स्पर्श होणार नाही. किंबहुना चांगल्यावाईटाची समज वेळीच येईल. योग्य वय, काळ आणि वेळेत सर्व योग्य गोष्टी घडल्या पाहिजेत. सरकारने मोफत शिक्षण आणि बऱ्याचशा सवलती दिल्या असल्या, तरी सर्वसामान्यांतील किती लोकांनी त्यांचा उपयोग आपले, पर्यायाने आपल्या कुटुंबाचे, समाजाचे आणि देशाचे भले करण्यासाठी केला आहे, याची जाणीव ठेवून समाजात उद्बोधनाचे पवित्र कार्य आपण सुसंस्कारांच्या माध्यमातून प्रामाणिकपणे केले पाहिजे.

आपल्या अंगी उपजत असलेल्या कलागुणांची जोपासना करण्यासाठी योग्य आणि आश्वासक पावलं उचलणं ही काळाची गरज आहे. 'उद्योगाचे घरी, देवता लक्ष्मी वास करी' ही उक्ती खरी ठरविणारे चांगले संस्कार केवळ आपलंच नव्हे; तर विश्वाचं कल्याण करतील. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी विश्वाच्या कल्याणासाठी मागितलेले 'पसायदान' सुसंस्कारांची मौल्यवान अशी खाण आहे. भारतभूमीच्या पोटी जन्माला आलेल्या प्रत्येकाला जन्मापासून ही संस्कृती दुसऱ्याला वाचविण्यासाठी, प्रसंगी स्वत:च्या प्राणाची आहुती देणारी भूतदया शिकवते, ते केवळ सुसंस्कारांमुळेच!

✾✾

पंचवीस

# भिजल्या मातीत...

*फांद्यावरी बांधिले गं,*
*मुलींनी हिंदोळे*
*पंचमीचा सण आला,*
*डोळे माझे ओले...*

हे गाणं आठवलं की, मनही आनंदाच्या हिंदोळ्यावर झुलू लागतं. मनामनाला हिरवा तजेला देणारा श्रावण मनावर अधिराज्य गाजवू लागतो. सासुरवाशिणी माहेराच्या ओढीनं मोहरून जातात. एकामागून एक येणारे श्रावणातील सण विविधांगी आनंदाची उधळण करून मनाला मनोहारी आनंद देतात.

श्रावण म्हणजे ऊन-पावसाचा लपाछपीचा महिना! श्रावण म्हणजे पाऊससरींची उधळण! श्रावण म्हणजे कवीच्या काव्यप्रतिभेचा अंकुर फुलविणारा शब्दप्रभू!

अवघ्या मुलखात श्रावणापूर्वी पडलेल्या पावसानं निर्माण झालेली हिरवाई आणि श्रावणातील सण यांच्या संगमानं होणारा आनंद शब्दातीत आहे. उजाड झालेली डोंगररानं, अतृप्त असलेली जमीन यांसारख्या अनेक बाबी आकंठ पाणी पिऊन तृप्तीचा ढेकर देत असतात.

*श्रावणमासी हर्ष मानसी*
*हिरवळ दाटे चोहीकडे*
*क्षणात येते सरसर शिरवे,*
*क्षणात फिरूनी ऊन पडे!*

बालकवींनी टिपलेला 'हिरवा श्रावण' असा प्रसन्नपणे आपल्यासमोर येतो. निसर्ग आणि पर्यावरणाचं अतूट नातं मानवाला सांगतो. निसर्गातील हिरवाई मनाला तृप्त करतानाच आयुष्यातील भल्याबुऱ्या प्रसंगांना कवितांच्या ओळींतून अनेक कवींच्या कविताही ओल्याचिंब होतात.

*श्रावणात घन निळा बरसला,*
*रिमझिम रेशीमधारा*
*उलगडला पानातून हिरवा,*
*अवचित मोरपिसारा!*



कविश्रेष्ठ मंगेश पाडगावकरांच्या कवितेतला श्रावण पानांतील हिरवाई उलगडून दाखवतो. मोर आणि श्रावण यांचं नातं तर अनंत काळापासून सख्यासवंगड्याचं आहे. श्रावण आला की, मोर थुईथुई नाचू लागतो. त्याच्या मनोहारी मोरपिसाऱ्यात इंद्रधनूचे सप्तरंग उठावदारपणे आनंदाने नाचतात, बागडतात...

*सावन का महिना,*
*पवन करे शोर*
*जियरारे झूमे ऐसे,*
*जैसे बनमा नाचे मोर...*

हिंदी चित्रपटातलं हे गाणं फक्त श्रावणातच नव्हे; तर इतर केव्हाही गुणगुणावं... आपलं व्याकूळ, दु:खी मनही आनंदी, तृप्त होऊन जातं. सृष्टीसौंदर्याची अनमोल नजाकत देणारा श्रावण आणि श्रावणातील पाऊस हे एकमेकात इतके गुंतले आहेत की, त्यांना कोणीही वेगळं करू शकत नाही.

*नेमेची येतो पावसाळा,*
*तेच पाणी तोच चिखल*
*एवढाच फक्त नको खल*
*मऊ मुलायम श्रावणसरीत*
*भिजता आलं पाहिजे.*

कवी कमलाकर देसले यांच्या या कवितेत आयुष्यातला आनंद देणारा श्रावण सकसतेनं शब्दबद्ध करताना अतिपावसामुळं होणारा त्रास कुठल्या कुठं पळवून लावतात. आनंदाची सप्तरंगी उधळण करणारा, चराचर सृष्टीला नखशिखांत हिरवं लेणं नेसवणारा, दु:खाला नष्ट करून आनंदाची मुक्त बरसात करणारा, सृजनशील साहित्यिकाला नवनवीन कल्पनांची प्रतिभा मुक्तहस्ते देणारा, पावसाची मनोहारी नजाकतच नव्हे; तर निसर्गातील अत्युच्च अभिव्यक्ती देणारा, निसर्गाबरोबरच पर्यावरणातील सर्वांचं रक्षण करण्याची शाश्वती देणारा 'निसर्गराजा' श्रावण किती किती रूपांनी आपल्यासमोर येत राहतो.

श्रावणातले सण आणि पावसाचा लपाछपीचा खेळ यांचं नातं अबाधित ठेवण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. परकेपणा आणि द्वेष दूर सारून माणसांची मनं जुळण्याची प्रेरणा निदान श्रावणामुळं तरी आपण घेतली पाहिजे. नवनिर्मितीची प्रेरणा देणारा श्रावण प्रामाणिकपणे साहित्यातून अभिव्यक्त व्हायला हवा. मनातील आढेवेढे दूर सारून संपूर्णपणे दुसऱ्यासाठी समर्पण करण्याची भावना निर्माण करणारा श्रावण, आपण चांगलं वागून माणुसकीचा गौरव टिकवण्याची शिकवण देत असतो. शेतीवाडी, नोकरीधंदा चांगला

टिकावा, चालावा म्हणून स्वावलंबनाचे धडे देत असतो. निसर्ग आणि विज्ञानावर अवलंबून असलेल्या माणसानं निदान श्रावणाची मुक्त बरसणारी पावसाची प्रामाणिकता आणि स्वत: हिरवाईची मुक्त उधळण करण्याचं स्वावलंबन जरी अवलंबलं तरी तो आनंदी होईल. दरवर्षी श्रावणातला पाऊस संततधार कोसळून आनंदाची उधळण अव्याहतपणे करेल. कविवर्य कुसुमाग्रजांच्या शब्दांत तो आलाच आहे...

**नाजूक, कोमल पाऊल टाकीत**
**भिजल्या मातीत श्रावण आला...**



सव्वीस

## शब्दफुलांचा महोत्सव...

दीपावली म्हणजे प्रकाशाचा उत्सव! नाचत-नाचतच आनंदाने गावे असे एक मधुर गाणे! दीपावलीचा आकाशव्यापी आनंद ओसंडून वाहत असतो. इतका अत्यानंद होतो की, आबालवृद्धही तेव्हा जाम खुश असतात आणि दीपावलीचा आनंद शब्दातीत जरी असला तरी शब्दाशब्दातून तो ओसंडतोय...

**दीपावली :**
**असते एक गाणे**
**मनामनात फुललेले**
**लहानांपासून मोठ्यांपर्यंत**
**फूल असते उमललेले!**

दीपावली फक्त फटाके, नवनवीन कपडे आणि यथेच्छ फराळ इतक्या गोष्टींतच अडकत नाही. तर तो शब्दाशब्दातून ओसंडत जाणारा महोत्सव असतो. दीपावलीच्या ज्ञानमय अशा प्रकाशकिरणांमुळे उजळलेला प्रतिभाविहंग रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवतो-

**दीपावली :**
**असतो प्रकाशाचा उत्सव**
**मनामनावर मोहिनी घालणारा**
**शब्दफुलांचा महोत्सव!**

दीपावली म्हटली की, सगळीकडे आनंदीआनंद. घराघरात नवे कपडे येणार! फराळाच्या रूपाने मिष्टान्नाची चव चाखायला मिळणार! शिवाय शाळेला सुट्टी असल्याने मजाच मजा. नोकरदार चाकरमान्यांना भरघोस बोनस मिळाल्याने तर अत्यानंद झालेला असतो. गृहिणींना मात्र अतिरिक्त कामाचा बोजाच सहन करावा लागतो. झाडझूड, आवरसावर, घासणं-पुसणं... अगदी जीव नकोसा होऊन जातो...

**दीपावली : खरंच सांगू काय असते?**
**लहानग्यांना सुट्टी असते,**
**नोकरांसाठी बोनस असते,**
**गृहिणींना कामच काम असते!**

दीपावली असते आकाशात सतत तेवत राहणारा तेजोमय मंगलदीप! आयुष्यभर ज्याच्या पाचवीला दु:खच पूजलेलं आहे, त्यालाही थोडाफार आनंद होतोच. दीपावलीच्या आनंदापोटी तो कर्ज काढून का होईना, खर्च करतो. फाटक्यातुटक्या कपड्यांची ठिगळं सांभाळत का होईना, तोंडावर उसनं हसू आणतो-

*दीपावली :*
*आयुष्यातील अंध:कार*
*तेजाने दूर करते,*
*मानवाच्या आयुष्यात*
*हास्याचा पूर आणते.*

दीपावली म्हटलं की, श्रीमंतांचा चैनीचा सण. जास्तीत जास्त खर्च करता यावा म्हणून श्रीमंत माणसं दीपावलीची आतुरतेने वाट पाहत असतात. आणि परत दीपावलीची गोड भूक भागावी म्हणून एनकेन प्रकारे पैसा कमवत असतात. त्यांचे उंची कपडे, फटाके, दागदागिन्यांचा झगमगाट पाहून गरीब भिकाऱ्याला खूप दु:ख होते. जणू काही आपण जन्माला आल्याची चूक वाटते.

दीपावलीमुळे एक मात्र नक्की होतं. ते म्हणजे घराची साफसफाई. वर्षभर साचलेला केरकचरा काढून स्वच्छता व नीटनेटकेपणा यांचा आदर्श वस्तुपाठ घालते ती दीपावली! दीपावलीची पूजा म्हणजे लक्ष्मीची पूजा. टापटीप, स्वच्छता, प्रसन्न वातावरण यांची देवी म्हणजे लक्ष्मी. पुराणकाळापासून 'स्वच्छतेच्या घरी देवता लक्ष्मी वास करी', असं म्हटलं जातं...

*दीपावली :*
*सर्व घर नीटनेटकं करते,*
*उत्साहमय स्वच्छ वातावरणात*
*घरात लक्ष्मी वास करते!*

दीपावली म्हणजे एकमेकांना जोडणारा दुवा. विविधांगी भेदाभेद, भांडणं, रुसवे-फुगवे दूर सारून, थोडाकाळ का होईना, मैत्रीचं, सौख्याचं नातं दृढ करते ती दीपावली...

*दीपावली :*
*बहीणभाऊ, नवराबायको*
*मैत्रीचं नातं दृढ करते.*
*भेदभाव अन् भांडणतंटा*
*यांना थोडी सुट्टी देते!*



दीपावली म्हटलं की, नवे कपडेलत्ते, चवदार फराळ आलाच. श्रीमंत जरी महागडे कपडे खरेदी करीत असले तरी गरीबही 'हम भी कुछ कम नही' या न्यायानं मीनाबाजारातून किंवा रस्त्यावरल्या हातगाड्यांवरून सेकंडहॅण्ड का होईना, कपडे खरेदी करतातच ना! आणि कमी तेलाचं किंवा पामतेलातला फराळ थोडाफार बनवतात आणि दीपावली 'गोड'पणे साजरी करतात. श्रीमंतांच्या साजुक आणि महाग तूपमिश्रित फराळाच्या चोचल्यानं खोकला जेव्हा सुरू होतो; तेव्हा त्याचवेळी रात्री गरीब बिचारे निश्चिंत मनानं झोपून उद्याची स्वप्नं पाहत असतात.

दीपावलीच्या मधुर आठवणी आपण आयुष्यभराचा साठा म्हणून जपत असतो. किंबहुना आयुष्यभर पुरेल इतकी शिदोरी बरोबर बांधून देते ती दीपावली ! आणि मग पुढे वर्षभर आपण दीपावलीची एकेक आठवण आठवून पुन्हा पुढच्या दीपावलीची वाट पाहत असतो.

**दीपावली :**
**असते आयुष्याची शिदोरी,**
**जिच्यावरचं फडकं सोडलं की**
**खात जावी एक एक भाकरी!**

आजाऱ्याचं आजारपणही दीपावली आली की, क्षणभर तरी दूर पळतं. नवे कपडे घालून, नव्या उन्मेषाने तोही दीपावलीचं स्वागत करतो आणि जीवनाचा उत्साहानं आस्वाद घेतो. परिणामी नंतर थोडाफार राहिलेला आजारही मनाच्या खंबरीपणाने नष्ट होऊन, आयुष्यात मधुरता निर्माण करण्याचं काम दीपावली करते...

**दीपावली :**
**आजारपण पळवते**
**उत्साह बळावते,**
**आपल्या आयुष्यात**
**मधुरता निर्माण करते!**

खळाळत्या उत्साहाचं प्रतीक म्हणजे समुद्राच्या अथांग पाण्यावर डौलाने चालणारी नाव. दीपावलीसुद्धा खळाळता उत्साह घेऊनच येते. दीपावलीचा चार-पाच दिवसांचा आनंद आपण मनमुराद घेत असतो.

फटाक्यांचा आवाज, देव्हाऱ्यातील नंदादीप, तेजोमय आकाशकंदील, फराळाचा आस्वाद, उटणे-अत्तराचा सुगंध दीपावलीच्या दिवसात घेऊन मनाला आनंदी उत्साह देतात...

*दीपावली :*
*असते उत्साहरूपी नाव*
*जिच्यात बसलो की,*
*नक्कीच सापडतो*
*स्वप्नामधला गाव!*

दीपावलीत निर्माण होणारा प्रकाशाचा झगमगाट अंधाराचा नाश करतो आणि तेजोमय विश्वास मनामध्ये निर्माण करतो. म्हणूनच झगमगाटाच्या दुनियेतही अखंड विश्वासावर चालणारं चैतन्यमय असं अजब रसायन म्हणजे दीपावली...

*दीपावली :*
*अंधाराचा नाश करणारा,*
*प्रकाशरूपी श्वास असते,*
*झगमगाटाच्या दुनियेतला*
*आश्वासक विश्वास असते!*

दीपावली म्हणजे अखंड ज्ञानसंकीर्तन! संतश्रेष्ठ नामदेव महाराजांनी म्हटल्याप्रमाणे 'नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी' या अभंगाप्रमाणे ज्ञानमयी ज्योत दीपावली जागवते आणि सगळीकडे महन्मंगलता निर्माण व्हावी म्हणून दीपावली प्रार्थना करते...

*दीपावली :*
*उजळते ज्ञानज्योती,*
*अनुकरण करण्यासाठी*
*तेवाव्या मांगल्याच्या वाती!*

सप्तसुरांनी नटलेलं गाणं असते दीपावली. ते मनापासून उत्साहाने गायले पाहिजे. सृजनता, नवचैतन्य यांचा सार असलेल्या दीपावलीच्या शुभेच्छा देताना एवढेच म्हणावेसे वाटते...

*दीपावली :*
*एका सुरात गावे गाणे,*
*उत्साहभरल्या नयनांनी*
*फुलवीत जावे तराणे!*

✽✽



सत्तावीस

## माझी सखी, माझं सर्वस्व!

आयुष्यरूपी सुखद वेलीवरचं सतत टवटवीत राहणारं फूल म्हणजे माझी सखी, माझं सर्वस्व! पावसाळ्यात सृष्टीनं हिरवा शालू नेसून मिरवावं, तशी ती माझ्या आयुष्यात नाचत बागडत आली नि माझ्या आयुष्याला सुखाची हिरवाई देऊन गेली.

*हिरवे हिरवे गार गालिचे*
*हरित तृणांच्या मखमालीचे,*
*त्या सुंदर मखमालीवरती,*
*फुलराणी ती खेळत होती!*

अशी आठवण प्रत्यक्षात पृथ्वीवर अवतरली, ती तिच्या अल्लड, अवखळ आणि नाजूक रूपात! तिला घडवताना देवाच्या डोळ्यासमोर नक्कीच रंभा, उर्वशी, मेनका उभ्या राहिल्या असणार, इतकी ती नखशिखांत सुंदर. लावण्य आणि निरागसता यांचा सुरेख संगम तिच्याजवळ आहे. आयुष्य आणि स्वर्ग यांचं अविरत सुख म्हणजे तिची सोबत.

कधी कधी ती इतकी रुसायची की, जणुकाही 'रुसू बाई रुसू, कोपऱ्यात बसू' असं वाटायचं. काही बोलणार नाही, वर पाहणार नाही, कुठं जाणार नाही, अगदी स्थिर, एखाद्या पुतळ्याप्रमाणं...

*हा रुसवा सोड सखे*
*पुरे हा बहाणा,*
*सोड ना अबोला...*

असं गाणं गुणगुणलं की इतकी जोरात हसायची आणि मग हळूच म्हणायची, 'कसं फसवलं?' तेव्हा कुठं माझा जीव भांड्यात पडायचा. मला असं चिडवणं तिला खूप खूप आवडायचं.

जीवनात यशस्वी होण्यासाठी तडजोडीचा सुवर्णमध्य साधणं तिला सहजासहजी जमायचं. राग आणि आनंद यातला शांततारूपी संयम होती ती. रात्र आणि दिवस यांच्यातला पहाटरूपी दुवा होती ती. स्त्री आणि पुरुष नात्यांमधील दोघांच्या मनीचा, आवडीनिवडीचा स्वीकार करणारी मनस्विनी होती ती. पाऊस आणि धरतीला मीलनाची जी आतुरता, उत्कटता, व्याकूळता असते, तशी त्या दोघांमधील आभाळरूपी दुवा होती ती.

एखादी गोष्ट तिला आवडायची. ती घेण्याचा हट्ट करायची. मात्र मी 'नाही' म्हटलं की हट्ट सोडून द्यायची. मात्र एखादी मला आवडणारी वस्तू घ्यायचं मी ठरवून तिला सांगितलं, की 'लगेच घ्यायला जाऊ' असं ती म्हणायची. माझं मन राखणं तिला कसं जमायचं कोण जाणे? दुसऱ्याच्या सुखासाठी किंवा सत्यासाठी स्वत:च्या प्राणाचं, एखाद्या अवयवाचं बलिदान देणाऱ्या महापुरुषांची आठवण तिला पाहून मला यायची.

'जगा, परंतु असे जगा की, हे जगणे होईल अवघे सुखकर' ही कवी नारायण थोरातांची कविता तिच्या रूपात, तिच्या वागण्यात, बोलण्यात मला क्षणोक्षणी दिसायची, भेटायची. तशीच त्यांच्याच कवितेतील

*कुणी असो लखपती*
*कुणी असो करोडपती,*
*मी जपलीय मात्र*
*माझ्या शब्दांची श्रीमंती!*

अशी शब्दांची अलौकिक संपत्ती ती जपायची. चांगलं वागणं, चांगलं बोलणं, एकमेकांच्या सुखदु:खाशी समरस होणं ही सारी मौल्यवान विचारांची श्रीमंती तिच्याकडे होती. म्हणून पैशाचा, पदप्रतिष्ठेचा मोह तिला कधीही झाला नाही.

सीतेनं रामासाठी त्यागलेलं वैभव-मानसन्मान, मंदोदरीनं रावणासारख्या कुटिल आणि राक्षसी प्रवृत्तीच्या माणसाचं सांभाळलेलं कुळ, सत्यवानाचं निधन झाल्यावरही त्याच्या प्राणासाठी यमाकडं याचना करणारी सावित्री, सत्यवचनी राजा हरिश्चंद्राबरोबर अनेक संकटांना तोंड देत त्याच्याबरोबर अजरामर झालेली तारामती, शहाजीराजांची भक्कम सोबत प्रत्यक्ष नसतानाही हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती राजे शिवाजी यांना घडविणारी माता जिजाऊ, सत्य-अहिंसेचे महामेरु महात्मा गांधींच्या खांद्याला खांदा लावून स्वातंत्र्यसंग्रामात स्वत:ला झोकून देणारी कस्तुरबा, शिक्षणाची गंगा तळागाळापर्यंत नेणाऱ्या महात्मा फुलेंच्या स्त्री शिक्षणाच्या महान कार्याचा वसा अखंड जोपासणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई अशा अनेक ज्ञात - अज्ञात महान स्त्रिया तिच्या रूपात मला दिसतात. देवानं किती उदात्त भावनेने हा स्त्रीजन्म दिला आणि माझ्या आयुष्याला तिच्यामुळं आलेला आकार पाहून मन धन्य धन्य झालं. माझी सखी, माझी आई, माझी पत्नी, माझी मुलगी, माझी शिष्या, माझी ओळख, माझी सावली, माझी कल्पना, माझी प्रेरणा, माझी प्रतिभा... कोण आहे ती? ती माझं सर्वस्व आहे. मला आयुष्यभर पुरून उरणारी!



## अठ्ठावीस

# पाहिजेत शब्द ....

*'शब्द शब्द ऐकता, सूर जुळावे,*
*सुरातुनी माझे तुला, प्रेम कळावे!'*

हे गाणे ऐकता ऐकता 'शब्द' हा दोन अक्षरी शब्द माणसाच्या बोलण्याचं प्रतीक; ज्यांना बोलता येत नाही; त्या पामरांनाही या शब्दाचा महिमा मनापासून जाणवल्याशिवाय रहात नाही. एका शब्दाचे अनेक अर्थ निघतात. 'मनी वसे ते स्वप्नी दिसे' आणि 'स्वप्नी दिसे ते शब्दांच्या माध्यमातून व्यक्त होत असे', असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. कवी हा मोजक्या शब्दांतून मोठा आशय व्यक्त करीत असतो. मात्र एखादा चपखल शब्द कवितेच्या ओळीत आल्याशिवाय त्याचे संपूर्ण समाधान होत नाही. म्हणून एका शब्दाचे महत्त्व तो कवीच जाणो. कविवर्य सुरेश भटांनी म्हटल्याप्रमाणे...

*स्मरल्या मला न तेव्हा, माझ्याच गीतपंक्ती*
*मग ओळ शेवटाची, सुचवून रात्र गेली!*

अशी ओळ आणि असे शब्द अजरामर होऊन जातात ते केवळ यामुळेच! कोणत्याही विषयावर बोलणारा, कोणत्याही विषयावर उत्स्फूर्त लिहिणारा लेखक हा खऱ्या अर्थाने शब्दप्रभूच असतो. अन्यथा आपल्यातील जास्तीत जास्त लोक 'विषय सांगा, अर्ध्या तासाने बोलतो, एक तासाने लिहून देतो' असेच म्हणतात. अगदी हा लेख लिहिताना मलासुद्धा खूप विचार करावा लागला. लिहू की नको? या विचारातच लिहायला बसलो नि शब्दांचा महिमा इतका मोठा आहे की, शब्द सुचत गेले, मी लिहीत गेलो. ज्येष्ठ साहित्यिक राम नरेश त्रिपाठी यांनी म्हटल्याप्रमाणे 'शब्द कवीला अमर करतात; तर कवी शब्दाला भाग्यवान बनवतो.' कविवर्य विंदा करंदीकरांनी कवितेत सांगताना म्हटले आहे की,

*पाहिजेत शब्द*
*बकुळीच्या कुशीतले, दर्याच्या मिशीतले!*
*पाहिजेत शब्द*
*पहाटेच्या ओटीतले, थडग्याच्या मिठीतले!*

कवी हा शब्दांचा पुजारी असतो. त्याच्या हातून निर्माण होणारी प्रत्येक रचना रसिकांना आवडावी, अशी त्याची आंतरिक इच्छा असते. मात्र तो कवितेतूनही शब्दांबद्दल जवळकीची

भावना व्यक्त करतो. उदाहरणच द्यायचे झाले तर प्रसिद्ध कवी खलील मोमीन यांच्या -

*मी भरून घेतो सारे,*
*हृदयाच्या काठोकाठ*
*शब्दांना देताना का,*
*पाझरता होतो माठ!*

या एका कवितेतील ओळींसारखी अवस्था होते. शब्दांमध्ये फार मोठी ताकद असते. शब्दांचा पसारा मांडताना कवितेतले शब्द समाजपरिवर्तनाची दिशा घेऊन येतात. मानव्याची शिदोरी उलगडून दाखवतात. ज्येष्ठ कवयित्री शांता शेळके यांची 'शब्द म्हणजे' ही बोलकी कविता म्हणते...

*शब्दांनीच परस्परांना*
*भिडू बघतो आपण*
*लढू पाहतो आपण;*
*शब्दांना शब्द भेटतीलच असे नाही*
*शब्दांशी शब्द पेटतीलच असे नाही!*

म्हणून कधीकधी 'तलवारीने केलेली जखम भरून निघते, पण शब्दांनी केलेली जखम कधीच भरून निघत नाही,' इतके शब्द जिव्हारी लागतात. एखादी व्यक्ती नाराज असल्यास त्याला आपण समजावून सांगितले, एखाद्या आजाऱ्याला एखादा विनोद सांगितला तर त्याचा आजार अर्धाअधिक पळून जातो, इतके मोठे सामर्थ्य शब्दांमध्ये आहे. एका शब्दाचे अनेक समानार्थी शब्द, सामासिक शब्द, संधी, विग्रह, वाक्यात उपयोग, निबंध, प्रश्नोत्तरे, चर्चा, परिसंवाद, वक्तृत्व, वाद-विवाद आदी अनेक उपक्रमांद्वारे शालेय व वैयक्तिक जीवनात होणारा सर्वात महत्त्वपूर्ण वापर हा खऱ्या अर्थाने उत्तम व्यक्ती आणि उत्तम वक्ता घडवीत असतो. म्हणूनच शब्दांचा महिमा अनन्यसाधारण आहे. तो सांगताना कविवर्य नारायण सुर्वे यांनी म्हटले आहे की -

*आम्ही नसतो तर हे सूर्य,*
*चंद्र, तारे बिचारे फिके फिके असते,*
*बापहो! तुमच्या व्यथांना*
*शब्दात अमर कोणी केले असते!*

✿✿



## एकोणतीस

# कवितेच्या थेंबातून...

पाऊस हा तीन अक्षरी शब्द मानवाच्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. कविता ही मानवी जीवनाच्या अनुभवांचं संचित असल्यामुळे पाऊसही कवितेतील शब्दरूपी थेंबातून निथळत निथळत मानवी हृदयात ओलावा निर्माण करून जातो. म्हणूनच भूमातेबरोबरच आपलंही तनमन भिजवून टाकणारा, स्वच्छ, निर्मळ जीवनाचं सृजन करणारा, आपला जिवाभावाचा सखा असणारा पाऊस कवितेचाही अविभाज्य घटक आहे. अनेकदा पाऊस आपल्याला कवितेतून भेटतो. कधी उन्मत्त, बेधुंद, कधी हळवा, रिमझिमणारा; तर कधी मनामनात ओलावा पेरून जाणारा, सृजनत्व निर्माण करणारा.

उन्हाळ्याची दाहकता, दुष्काळाच्या विदारक स्थितीने मानवी जीवनाचे पावसाअभावी होणारे हाल व पावसाच्या आगमनानंतर संपूर्ण सृष्टीला होणारा अत्यानंद हा पावसाळी कवितेचा अखंड चालणारा प्रवास आहे.

पावसाचं आगमन होऊन पृथ्वीवरील सर्व चराचरांना आनंदी व उत्साही करण्यासाठी वरुणराजाला साकडे घालताना कविवर्य आरती प्रभू म्हणतात,

*'ये रे घना, ये रे घना*
*न्हाऊ घाल माझ्या मना...*
*येई घना, येई घना*
*अजून पुन्हा, अजून पुन्हा...'*

पाऊस बहुधा आपल्याला चातकासारखी वाट पहायला लावतो. ज्याप्रमाणे प्रियकर व प्रेयसी एकमेकांना भेटण्यासाठी आतुर होतात. त्याचप्रमाणे धरित्री व पाऊस यांचं नातंही असंच आहे. म्हणूनच प्रा. शं.क. कापडणीस यांच्या कवितेतील धरती पावसाची वाट पाहताना आतुरतेने म्हणते,

*'मी कितीक पाहू वाट*
*करपून गेली काया,*
*माझ्या साजना पावसा*
*धाराधारांची दे माया!'*

ग्रामीण भागातील शेतकरी हा पावसाच्या पाण्यावरच सर्वस्वी अवलंबून असतो. मात्र

पाऊस नेहमीच त्याला चातकासारखा वाट पहायला लावतो. परिणामी नेहमीच दुष्काळाची गडद छाया त्याच्या मनावर पसरलेली असते. या भीतीने त्याच्या डोळ्यातील आसवेही आटून जातात. परिणामी त्याची अवस्था अतिशय बिकट होते. त्याच्या या अवस्थेचं उत्कट व जिवंत चित्र रेखाटताना कवी प्रकाश होळकर लिहितात,

*'पाणी मागावे नभाला*
*नभ कोरडे कोरडे*
*डोई पोटावर भार*
*आणि घागरीला तडे'*

अन् तेवढ्यात दारातला गुलमोहर जागा होतो. त्याच्या मिटलेल्या पाकळ्या फुलू लागतात. सारं झाड हलू लागतं. मनाच्या मातीआड दडून बसलेला पावश्या शीळ घालत कोरड्या आकाशाच्या कुशीत घिरट्या घालू लागतो. एकेक पाऊसथेंब पडू लागतो. मनामनातही पाऊस येऊ लागतो. मग आठवणींच्या कविताही बरसू लागतात. कविवर्य बा.भ. बोरकरांची कविता आनंद व्यक्त करताना म्हणते,

*'गडद निळे गडद निळे*
*जलद भरूनी आले*
*शीतलतनू चपलचरण*
*अनिलगण निघाले.'*

अशा रीतीने पावसाची जोशात व जोरात सुरुवात होते. श्रावण आणि पाऊस यांचं नातं अतूट आहे. एकदा श्रावण सुरू झाला की, पावसाची संततधार चालूच राहते. शिवाय श्रावणात येणाऱ्या सणांमध्ये तो स्त्रियांबरोबर खोडकरपणे झिम्मा-फुगडीही खेळतो.अशाच एका श्रावणाचं वर्णन करताना कविवर्य मंगेश पाडगाकर म्हणतात,

*'श्रावणात घन निळा बरसला*
*रिमझिम रेशीमधारा,*
*उलगडला झाडातून*
*अवचित हिरवा मोरपिसारा.'*

असा हिरवेपणा ल्यालेली श्रावणातली धरित्री पाहून कवितेचे शब्दही हिरवेपण लेऊन येतात.

पावसाच्या लयबद्ध थेंबांच्या, धारांच्या चालीवर पाऊसगाणीही फुलू लागतात. म्हणूनच कविवर्य मंगेश पाडगावकर गाण्याच्या निर्मितीतील पावसाचा अन्योन्य संबंध सांगताना म्हणतात,



*गाणं सांगू येतं कुठून?*
*डहाळीतून ओंकार फुटून...*
*गाणं प्राणात रुजून येतं*
*हिरवंगार भिजून येतं,*
*सगळं सगळं गाण्याचं*
*आभाळ जसं पाण्याचं...*

पाऊस हा मानवी जीवनाच्या उत्कर्षाचा अविभाज्य घटक असल्यामुळे प्रत्येक गोष्टीत पावसाचा संदर्भ येत असतो. आई... साऱ्या विश्वाचं आराध्य दैवत. आईबद्दल निर्माण झालेल्या अनेक कवितांमध्ये आईच्या जाण्यानंतर निर्माण झालेली कविवर्य ग्रेस यांची कविता पहा,

*ती गेली तेव्हा रिमझिम*
*पाऊस निनादत होता,*
*मेघात मिसळली किरणे*
*तो सूर्य सोडवीत होता.*

पावसाच्या दिवसातली संध्याकाळही ओलसर, हवेत प्रसन्नता माळून येते. म्हणूनच या पावसाळी संध्याकाळला आपल्या मनात साठवून ठेवणारे लक्ष्मीकांत तांबोळींचे शब्द सांगतात,

*एक पावसाळी संध्याकाळ*
*हळूहळू मनात येते,*
*ओला हळवा श्वास पेरून*
*आली तशी निघून जाते.*

पावसात भिजण्याचं, ओलंचिंब होण्याचं सुख काही निराळंच. पावसात चिंब चिंब भिजताना, प्रेयसीच्या मनात जणू आपल्या प्रियाला आपण भेटतच आहोत की काय असा मनात भास होतो. मात्र डोळे उघडले की, या स्वप्नाचा चुराडा होतो. त्यावेळी मधुवंती सप्रेंची कविता स्मरते,

*आल्या पावसाच्या धारा; त्यांनी लाविला गंधार,*
*माझ्या मनात दाटला; शुद्ध विरहाचा पूर.*

नवनिर्मिती, सृजनशीलतेला बहर आणणारा पाऊस कुणाला आवडणार नाही. कविवर्य कुसुमाग्रजांनी पावसाला जीवनदूताची उपमा दिली आहे. त्यांच्या कवितेतला श्रावण लपत छपत बरसतो,

*तांबूस, कोमल पाऊल टाकीत*
*भिजल्या मातीत श्रावण आला*
*लपत छपत हिरव्या रानात*
*केशर शिंपीत श्रावण आला!*

सखीच्या आठवणींचा पाऊस सख्याच्या मनात नेहमीच रेंगाळत असतो. म्हणूनच सखीच्या जाण्याची रुखरुख व्यक्त करताना विलास धामणे म्हणतात,

*नुकताच कुठे पावसाळा सुरू झालाय*
*अन् गुलमोहोरही झडायला लागला.*
*अशात तू सोडून जायच्या गोष्टी करतेस,*
*कमीतकमी तुझ्या आठवणींची गाणी*
*तरी लिहून जा-*
*तेवढंच....*
*पावसाळा येऊन गेल्याचं जाणवत राहील.*

पावसाचा खरा आनंद बालगोपाळच पुरेपूर उपभोगतात. पावसाळ्याला सुरुवात झाली की, आबालवृद्धांच्या तोंडी गाणं येतं-

*ये रे ये रे पावसा*
*तुला देतो पैसा,*
*पैसा झाला खोटा*
*पाऊस आला मोठा!*

असं गाणं म्हणत म्हणत लहान मुलं पावसात चिंबचिंब भिजतात. कागदी होड्या सोडतात आणि शाळेला बुट्टीही मारतात.

पावसाचं येणं हे अनाहूत पाहुण्यासारखं असतं. तो जेव्हा बेभान बरसतो, तेव्हा जिवाचा सखासोबती ठरतो. मात्र अधून-मधून पडला की, आपल्या टीकेचं लक्ष्य ठरतो. म्हणूनच त्याच्याबद्दलच्या विविध कल्पनांची उधळण करताना कवी शंकर वाडेवाले आपल्या कवितेत म्हणतात,

*पाऊस नव्या नवतीचा*
*अवखळ उखाणा,*
*डोळ्यांभोवतीचा चावट पाहुणा,*
*पाऊस अवेळीचा अवखळ पाहुणा*
*ऊस गोंदल्या सरीत खळाळता तराणा.*



अशा एक ना दोन किती पावसाच्या कविता सांगाव्या? पावसाळ्यातली किती काव्यदृश्ये तुमच्या नजरेसमोर उभी करावीत? पाऊस कवितेला विश्वाच्या शेवटापर्यंत अंत नाही. कारण तुम्हीही माझ्यासारख्या अनेक कवितांमधला पाऊस अनुभवला असेल. तुमच्या मनालाही या कवितांच्या शब्दमय थेंबांनी चिंबचिंब भिजवलं असेल. तेव्हा ही पाऊसगाणी आठवा आणि अंत:करणापासून चिंबचिंब भिजा. मग पहा जीवनात काय बहार येते ती!

✾✾

तीस

# जीवनात ही घडी...

प्रत्येकाचे जीवन म्हणजे सुख-दु:खाच्या उभ्या आडव्या धाग्यांनी विणलेला रुमाल आहे. सुखाच्या मऊशार हिरवळीचा आस्वाद घेता घेता दु:खाचे चटके सोसावेच लागतात. संकटांना सामोरे जाऊनच जीवन खऱ्या अर्थाने पुढे सरकत जाते.

*नाही निर्मळ जीवन*
*काय करील साबण?*

अशी जीवनाची साधी, सरळ सोपी व्याख्या करताना संत तुकारामांनी अंतर्बाह्य निर्मळता डोळ्यांसमोर ठेवली आहे. कुठलेही आमिष ज्या मनाला बळी पाडू शकत नाही, असे जीवन प्रत्येक माणसाला मिळालं तरच पृथ्वीवरील प्रत्येक माणूस हा सुखी आणि समाधानी होईल आणि हे जग खऱ्या अर्थाने सुंदर बनेल. संत रामदास स्वामींनीही मनाच्या श्लोकात सज्जन माणसाची लक्षणे सांगताना अतिशय उत्कटतेने म्हटले आहे -

*'देहे त्यागिता कीर्ती मागे उरावी*
*मना सज्जना हेचि क्रिया धरावी*
*मना चंदनाचे परी त्वां झिजावे*
*परी अंतरी सज्जना नीववावे!*

ध्येयशील आयुष्याचे गणित ज्याने अतिशय चांगल्या रीतीने सांभाळले आहे, तोच माणूस जीवनाबद्दलचा विचार होकारार्थीपणे करतो. जीवनात रोज नवा नवा विचार आपण ऐकत असतो, वाचत असतो. त्या त्या वेळी वाचनाने चिंतन आणि मनन करून काही माणसं नवनवीन विचार आणि साहित्याला जन्म देत असतात. याचाच अर्थ असा की, आयुष्याचा प्रत्येक नवा दिवस एक नवे कोरे पान असते. त्यावर नवी गीते, नवे विचार, नव्या योजना आणि नवीन आकांक्षांची पेरणी करायला हवी, तरच माणसाच्या दु:खाचे रूपांतर सुखी, समाधानी जीवनात होईल.

मन, मेंदू आणि मनगट बळकट असणारा आणि नव्या युगाला सामोरा जाणारा समाज निर्माण करण्यासाठी जीवनात उत्साह असावा. नैराश्येच्या पिकलेल्या पानांना छाटून चैतन्याची नवी पालवी प्रत्येक मनुष्यवृक्षाला फुटण्यासाठी आपल्याला प्रयत्न करावयाचा आहे.



'पिकल्या पानाचा देठ की हो हिरवा...' असे गाण्याचे सूर जेव्हा कानावर पडतात; त्यावेळी वार्धक्यावर मात करून तारुण्याची सळसळ आपल्याला ऐकू येते आणि वरवर पाहता वार्धक्याकडे झुकलेला माणूसही तारुण्याची नजाकत अनुभवतो. यालाच जीवन म्हणतात. 'जी' म्हणजे 'जिवंतपणा', 'व' म्हणजे 'वसंत' आणि 'न' म्हणजे नंदनवन'! म्हणजेच 'जिवंतपणातील वसंतमय नंदनवन' असलेलं जीवन, की जे एकदाच मिळतं. त्याचा उपभोग आपण निश्चितपणे, नि:संकोच घेतला तरच खऱ्या अर्थाने आपण जीवन जगलो, असे म्हणता येईल.

प्रत्येकाला एकमेकांची लागणारी ओढ, प्रत्येकाविषयी मनात असणारा प्रेमळ स्वभाव आणि भेटीची अनामिक हुरहूर मनात जीवनानुभवाची आगळीवेगळी प्रचिती देतात. प्रत्येकजण दुसऱ्याची आतुरतेने वाट पहात प्रा. प्रवीण दवणे यांचे शब्द घेऊन म्हणतोच ना -

*'कुणीतरी वाट बघतं प्राणातून*
*म्हणून जाण्यात मजा आहे,*
*कुणीतरी ऐकत असतं हृदयातून*
*म्हणून गाण्यात मजा आहे!'*

प्रत्येक गाणं वेगवेगळा जीवनानुभव देत असतं. 'जीवनात ही घडी अशीच राहू दे, प्रीतीच्या फुलावरी वसंत नाचू दे...' असं गाणं प्रेमी युगुलाचं प्रेम फुलविण्याबरोबरच संसारही फुलवतं. अगदी सात जन्मी हाच पती किंवा पत्नी मागणारा माणूस जीवनाचा खऱ्या अर्थाने रसिकतेने आस्वाद घेतो. चांगलं बोलावं, चांगलं ऐकावं, चांगलं लिहावं, चांगली मौजमजा करावी आणि सर्व चांगलं झालं की, हे जीवनही चांगलं होईल नि साऱ्या सृष्टीचं नंदनवन होण्यास वेळ लागणार नाही.

✻✻

एकतीस

# स्वप्नांची मोहमयी दुनिया

स्वप्न... या दोन अक्षरी शब्दात काय जादू आहे कोण जाणे; परंतु प्रत्येकाच्या आयुष्याला मिळणारी कलाटणी स्वप्नांशिवाय मिळत नाही. बालपण ते वृद्धावस्थेपर्यंत प्रत्येकजण स्वप्न पाहतच आयुष्य कंठीत असतो. नाही म्हणायला वास्तवाचे चटके सहन करावे लागतातच. मात्र सुखाची स्वप्ने पाहतच माणूस दुःखाच्या पसाऱ्यावर मात करीत असतो. अगदी लहान मुलाचंच उदाहरण घ्या ना! ते झोपेत गोड हसत असेल तर आपण म्हणतो की, त्याला स्वप्नात पऱ्या दिसत असतील; तो त्यांच्याबरोबर आकाशाची सफर करीत असेल. खरं काय, हे माहीत नाही. तर, अशी ही स्वप्नांची मोहमयी दुनिया.

*स्वप्नात साजनी येशील का?*
*येशील का? येशील का?*

अशी आर्जवं उगीच नाही कुणी प्रेमवेडा करीत. तारुण्याच्या लाटेवर स्वार होणारे प्रेमवीर एकमेकांच्या उत्कट भेटीचं, एकमेकांच्या सुखद सहवासाचं मधुर स्वप्न पाहत असतात. ना तहान, ना भूक; प्रेमात रंगलेल्यांची दुनिया अशीच मोहमयी स्वप्नांची असते. मात्र ही प्रेमाची स्वप्नं किती वास्तवात उतरतात त्याचा हिशोब करायचा नसतो. कारण ते वयच तसं असतं, प्रेमाच्या आणाभाका घेण्याचं! मनमुराद खायचं, प्यायचं नि मजा मारायचं! या वयाला ना कोणताही बांध, ना आडकाठी. तारुण्यात काय स्वप्नं पडतील, याचा भरवसा नाही. प्रा. संजय धिवरे यांच्या वात्रटिकेतही तसंच घडतं-

*एकदा माझ्या स्वप्नात*
*अमिताभ बच्चन आला,*
*शेजारी झोपलेल्या बापाला*
*मी जोरात ठोसा दिला!*

मात्र नंतर बापानं त्याची किती धुलाई केली, हे सांगण्याच्या आधीच तो तरुण मित्रांच्या गराड्यातून पळून जातो.

शेखचिल्ली आणि स्वप्न यांचं नातं लहानपणापासून आपण अनेक गोष्टींतून अनुभवत आलोय. 'खयाली पुलाव पकाना, दिवास्वप्न पाहणे' यांसारख्या वाक्प्रचारातून शालेय जीवनात भावी आयुष्याला दिशा देणारं स्वप्न पाहावं, या अपेक्षेने आपण शिकत जातो.



'स्वप्न पाहणं' कितीही रंजक असलं; तरी अगदी लहानपणी प्रत्येकाला डॉक्टर, इंजिनिअर, वकील, शिक्षक, वक्ता व्हावं अशी स्वप्नं पडतात किंवा मोठ्या माणसानं विचारलं की, तू मोठेपणी कोण होणार? आपलं उत्तर ठरलेलं! मी अमुक-तमुक होणार! प्रत्येकाच्या मनातील इच्छा प्रत्यक्षात खऱ्या होत नसल्या तरी माणूस धडपड केल्याशिवाय रहात नाही. परंतु पैसा, बुद्धी, मानसिक, शारीरिक स्थिती ही माणसाला घडवत असल्यानं स्वप्नांचा पाहिजे तसा अर्थ लावला जातो.

मनातील चांगल्यावाईट भावभावना आणि सुप्त इच्छा, आशा-आकांक्षा यांचं प्रतिबिंब स्वप्नात उमटत असल्यानं, स्वप्नं पडल्यानंतर खऱ्या अर्थानं माणसाला आनंद देतात. उत्साहित करतात. तर दुःखी स्वप्नं माणसाला येणाऱ्या दुःखी किंवा खडतर जीवनाची कल्पना देऊन वेळीच सावरण्याचं पुरेसं बळही देतात. म्हणूनच स्वप्न पाहणं हे शरीराबरोबरच अंतर्मन जिवंत असल्याचं प्रतीक असतं! मात्र स्वप्नाळूवृत्तीचा वापर किती, कुठं व कसा करावा, याचा सारासार विचार करूनच स्वप्नांचा मनमुराद आनंद लुटावा आणि आपलं जीवन सुखी व समृद्ध करून घ्यावं. स्वप्नातील कळीसारखं विचाराचं प्रत्यक्ष जीवनात वावरताना दातृत्वाचं फूल फुलावं, ही मनस्वी इच्छा बाळगूनच स्वप्नांच्या मोहमयी दुनियेला सामोरं जावं.

रोजच्या व्यवहारात आज महागाई, भ्रष्टाचार, देशद्रोही वृत्ती, बेकारी, लोकसंख्यावाढ आदी अनेक समस्यांनी त्रस्त आपण माणसं जर स्वप्नांचा सहारा घेऊन थोडीतरी माणुसकी, दातृत्व, चांगुलपणा शिकलो तरी उज्ज्वल भवितव्याची इच्छा निदान स्वप्नात तरी पूर्ण होईल, अशी अपेक्षा करायला काय हरकत आहे?

✽✽

बत्तीस

## पाऊस असा वेडा की...

निसर्गाला पडलेलं एक गोड स्वप्न म्हणजे पाऊस. आसुसलेली धरती आणि तिची भूक भागविणारे आभाळ यातील मनोहारी दुवा म्हणजे पाऊस. जगातील सारी सुखं ज्याच्यावरून एका क्षणात ओवाळून टाकावीत, ती फक्त एका पावसावरून. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या तिन्ही ऋतूंमध्ये प्रत्येकाला सर्वात जास्त हवाहवासा वाटणारा ऋतू म्हणजे पावसाळा. कवी आणि लेखक यांचं सर्वात पहिलं व सर्वात जास्त प्रेम असतं फक्त पावसावर; त्याच्या आश्वासक येण्यावर!

'येरे येरे पावसा, तुला देतो पैसा...' नि 'सांग सांग भोलानाथ; पाऊस पडेल का?' पासून 'सरीवर सरी आल्या गं...' आणि 'चिंब पावसानं रान झालं आबादानी'पर्यंत अनेक गीतं ऐकताना त्या गाण्यातला अर्थ समजून मनही चिंबचिंब भिजून नाचू बागडू लागतं.

पाऊस... त्रिकालाबाधित सत्य! पाऊस सृजनात्मक चिरंतन अनुभूती. केवळ पावसामुळे साऱ्या विश्वात सृजनाची निर्मिती होते. या पृथ्वीतलावर पावसासारखा निरागस, भाबडा तसाच उधळमाणका नि धसमुसळा ऋतू कोणताच नाही. कारण कधी तो बारीक बारीक थेंबांनी गारव्याचा शिडकावा करतो, तर कधी कधी चार चार दिवस अगदी मुसळधार कोसळतो.

उन्हाळ्यातील अंगाची होणारी काहिली, पाणी पाणी करणारा जीव आणि जमिनीच्या भेगा सारेच त्याची आतुरतेने वाट पाहात असतात. तोही नाचत बागडत, हसत खेळत येतो. अवघी धरती हिरवीगार करून, मनामनांना हिरवेपणानं ओलंचिंब करणारा ऋतुराज पावसाळा अवघ्या चार महिन्यात पुढच्या आठ महिन्याचा ओलेपणा निर्माण करून जातो. पावसाचं आगमन झालं की, पूर्वीच्या पावसाळ्यात अनुभवलेली पाऊसदृश्ये डोळ्यांसमोर उभी राहतात. पावसाच्या प्रत्येक थेंबातून प्रत्येक सरीतून लहानपणी निरागसतेनं भिजणारं बालपण नजरेसमोर उभं राहतं. मन जुन्या आठवणीत जाऊन, गतआयुष्याची सहल घडवून आणतं.

*पाऊस असा वेडा की ।*
*तो नको तिथे कोसळतो ॥*
*अन् थकल्या पायी परतून ।*
*आईच्या कुशीत रडतो ॥*



कवी सुवर्ण कुलकर्णींच्या काव्यातली अशी पावसाची वेगवेगळी रूपं डोळ्यासमोर येताना खऱ्या अर्थानं आपणही मनापासून पाऊसमय होऊन जातो. तप्त झालेली धरणी आसुसल्या वृत्तीनं पाऊसपाणी शोषून घेते आणि मग जमिनीचा सुटणारा सुगंध जगातील साऱ्या अत्तरांपेक्षा श्रेष्ठ असा अनुभवता येतो. कस्तुरीच्या सुगंधालाही मागं टाकणारा हा सुगंध कित्येक दिवस मनात साठवून ठेवावा, असं सारखं वाटत राहतं.

कधी नाजुक थेंब तर कधी सरीवर सरी, कधी विजांच्या कडकडाटानं, ढगांच्या गडगडाटानं धुवाँधार बरसात; तर कधी छत्री वा रेनकोट नसला की, नखशिखांत चिंब भिजवणारा... अशी त्याची विविध रूपं अनुभवणं मनाची प्रसन्नता वाढवतं. हे सर्व अनुभवणं मनाच्या प्रसन्नतेबरोबर मनाला सतत आनंददायी, उत्साहवर्धक, टवटवीत बनवतं. म्हणूनच मनाच्या उसळत्या चैतन्याला बहर आणण्याचं प्रामाणिक काम करतो तो पाऊस!

या पावसात काय जादू आहे, कोणास ठाऊक; पण लहान मुलांसह वयोवृद्धांनाही आपलं वय विसरायला लावणं जमतं ते फक्त पावसालाच. उतारवयातही तारुण्याची सळसळ निर्माण करतो तो पाऊस! कारण पावसात भिजताना उतरतं वय आणि आजाराची पर्वा न करता सगळे पावसात मनमुराद भिजतात. शिवाय धुवाँधार पावसापासून स्वत:चा बचाव करताना त्यांची जी त्रेधा उडते ते पाहून इतरांना हसू आल्याशिवाय राहात नाही.

प्रत्येक प्राणिमात्राने मनात सदैव जोपासावा, साठवावा असा पाऊस विविध रूपांतून भेटतो. पाऊस नसतानाही त्याच्या आठवणी मनात येणं, सदैव टवटवीत, मनाची सृजनता वाढवून, वैभव प्राप्त करून देतात तेव्हा पावसाचं महत्त्व पटतं! म्हणूनच ही उक्ती लागू पडते ती फक्त त्या चैतन्यमय पावसासाठीच!

✾✾